दैनिक
# जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

## जलेश्वर तलावाजवळील अतिक्रमण काढण्याबाबत नियमानुसार कारवाई करावी- मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई :** हिंगोली शहरातील जलेश्वर तलावाजवळ अतिक्रमणे आहेत. याबाबत न्यायालयाच्या निर्देशानुसार नियमानुसार जिल्हा प्रशासनाने कारवाई करावी, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.मंत्रालयात यासंदर्भात बैठक मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला आमदार सर्वश्री बबनराव लोणीकर, अमोल मिटकरी, बच्चू कडू तसेच नगरविकास, महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे हिंगोलीचे जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर व अधिकारी उपस्थित होते.मंत्री श्री. देसाई म्हणाले, अतिक्रमण केलेल्या नागरिकांची दुसरीकडे निवासस्थाने आहेत काय याचा शोध घ्यावा. या कारवाईत कुणीही बेघर होणार नाही, याची काळजी घ्यावी. अतिक्रमण काढण्यासाठी नियमानुसार व न्यायालयाच्या निर्देशानुसार कारवाई करावी. बैठकीत जिल्हाधिकारी श्री. पापळकर यांनी माहिती दिली.

■(आष्टी) वर्धा ■बुधवार, दि.३ जानेवारी २०२४ ■ वर्ष २ रे ■अंक १८० ■पृष्ठ ६ ■मुल्य ५.०० ■मुख्यसंपादक : राहुल गजरे ■कार्यकारी संपादक : अवधूत शेंद्रे RNI NO : MAHAR/2020/82242

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून प्रबोधनाचे कार्य व्हावे- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**वृत्तसंस्था ■ ठाणे**



शासनाने शेतकऱ्यांसाठी बनविलेल्या टास्क फोर्सचे पुनर्गठन लवकरच केले जाणार आहे. विविध संत-महात्मे या राज्यात समाज प्रबोधनाचे काम करतात. राज्यातील ज्या भागात शेतकरी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे, त्या भागात आपले प्रबोधनाचे कार्य कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून व्हावे. शेतकऱ्यांच्या मनात सकारात्मक विचार यावेत, त्यांच्यात विचार परिवर्तन व्हावे, यासाठी आपण प्रयत्न करावेत, यासाठी शासन सर्वतोपरी मदत करील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील उसाटने - नार्हेण फाटा, तळोजा एमआयडीसी रोड येथे आयोजित श्री मलंगगड हरिनाम सप्ताह-अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार किसन कथोरे, आमदार गणपत गायकवाड, आमदार डॉ. बालाजी किणीकर, माजी मंत्री ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, आचार्य प्रल्हाद महाराज शास्त्री, विश्वनाथ महाराज म्हाळुंगे, चेतन महाराज म्हात्रे, दिगंबर शिवनारायण, विष्णू मंगरुरकर, गणपत सांगू देशेकर, गोपाल चेतन, शंकर गायकर, दिनेश देशमुख, गणेश पीर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, वारकरी भाविकांची उपस्थिती पाहून पंढरी अवतरल्याचे वातावरण तयार झाले आहे. या वातावरणात हातात टाळ घेवून रिंगणामध्ये आणि दिंडीमध्ये सहभागी होताना देहभान विसरायला झाले. 'देवाच्या या दारी उभा क्षणभरी..! या उक्तीची अनुभूती येऊन देवाच्याच दारी आपण सगळे उभे राहिलो आहोत, संस्कृती आहे. श्री क्षेत्र मलंगड आणि या भूमीतील पुरातन शिवमंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मराठी संस्कृतीचे वैभव असणारा हा वारकरी संप्रदाय जीवनातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडून ईश्वर भक्ती शिकवितो. कीर्तन-प्रवचनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करतो. कीर्तनकाराचे महत्त्व आपल्या महाराष्ट्रात खूप आहे. धर्मवीर आनंद दिघे प्रत्येक हरिनामाला उपस्थित राहायचे. धकाधकीच्या आयुष्यातूनही ते हरिनामासाठी वेळ काढायचे आणि आम्हालाही सांगायचे. सन्मार्गावर कायम चालत राहण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह ही काळाची गरज आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, भारत हा तरुणाईचा देश आहे. या तरुणांमध्ये देश आणि समाजाच्या प्रगतीसाठी काहीतरी चांगले करून दाखविण्याची उमेद आहे, ही समाधानाची बाब आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा याचे तारतम्य महाराष्ट्रात नेहमीच दिसून येते. देव, देश आणि धर्म जपणारी आजची तरुण पिढी आपण तयार करतोय, याची खात्री असाच भास होत आहे. अखंड हरिनामाने भरलेल्या या वातावरणात सर्व काही विसरायला लावणारी ही अध्यात्मिक ताकद आहे. आमच्या सारख्या राजकारण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये संत महात्मांच्या प्रेरणेने देश आणि समाज कार्यासाठी काम करण्याची उमेद निर्माण होते. मला काय मिळाले, यापेक्षा मी देश आणि समाजासाठी काय देतो, ही भावना जागृत होते. म्हणूनच राजकीय अधिष्ठानापेक्षा अध्यामिक अधिष्ठान सर्वश्रेष्ठ आहे.

महाराष्ट्राला संतांच्या मार्गदर्शनाचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभला आहे. संतांचा सन्मान करणे, ही आपली आजच्या या हरिनाम सप्ताहाच्या प्रतिसादातून दिसून येत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेबांचे राम मंदिर निर्माणाचे स्वप्न २२ जानेवारीला पूर्ण होत आहे. त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार. या दिवशी सर्वांनी या महोत्सवात सहभागी व्हावे.

राज्यातल्या सर्व पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. तीर्थक्षेत्रांचा विकास केला जातोय. अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिरास १३८ कोटी रुपयांचा निधी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मिळवून दिला आहे. अशाच प्रकारे पंढरपूर तीर्थक्षेत्र विकासासाठी देखील सरकारकडून निधी कमी पडू दिला जाणार नाही. आषाढी व कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने वारीला जाणाऱ्या भाविकांना शासनाकडून सर्व प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या जात आहेत, यापुढे अधिकाधिक सोयी-सुविधा दिल्या जातील. शिवप्रताप दिन साजरा करण्याचा निर्णय या शासनाकडून घेण्यात आला आणि यापुढेही असे अनेक उपक्रम या शासनाकडून राबविण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

# नवीन इमारती, वसतिगृहांची कामे कालमर्यादेत पूर्ण करावीत- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**वृत्तसंस्था ■ मुंबई**



उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठ इमारती, विविध कार्यालये, वसतिगृहे, नवीन इमारत बांधकाम व इमारतींची दुरूस्तींची कामे कालमर्यादेत पूर्ण करावीत. त्यासाठी नियोजन करून निधीची उपलब्धता सुनिश्चित करावी, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज दिले.

मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील विविध इमारती, कार्यालये, जुन्या इमारतींच्या दुरूस्ती बाबत आढावा बैठक मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्ज्वला चक्रदेव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री. हांडे, जे. जे महाविद्यालयाचे संचालक राजेश मिश्रा, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उपसचिव अशोक मांडे, प्रताप लुबाळ, सहसंचालक हरीभाऊ शिंदे, आदिनाथ मंगेशकर उपस्थित होते.

लता मंगेशकर संगीत महाविद्यालय व संग्रहालय इमारत बांधकाम प्रस्तावाबाबत सूचना देताना मंत्री श्री. पाटील म्हणाले की, या इमारतीला आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. इमारतीच्या संरचनेमध्ये काही बदल करावयाचे असल्यास आताच करून घ्यावे. या बदलानंतर अंदाजपत्रकीय तरतुदींवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया गतीने राबविण्यात यावी. सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृह इमारत बांधकाम सुरू करावे. पुढील दोन वर्षात मुलींना वसतिगृह उपलब्ध झाले पाहिजे. त्यानुसार नियोजन करावे.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई येथील प्रस्तावित बांधकामाबाबत निर्देश देताना मंत्री श्री. पाटील म्हणाले की, इमारत बांधकामाचा प्रस्ताव २५० कोटी रूपये तरतुदीमध्ये बसवावा. पुढे आणखी निधी लागल्यास त्या पद्धतीने कार्यवाही करावी. इमारतीचे काम फेजमध्ये करावयाचे असून निधीमध्ये बसणारे फेज पुर्ण करावे. वांद्रे येथील सर जे. जे. कला महाविद्यालय संस्थेचे वसतिगृह व वास्तूशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह इमारतीचे काम सुरू करावे. हेरीटेज इमारत असल्यामुळे काम दर्जेदार करावे. एसएनडीटी विद्यापीठाच्या जुहू येथील सभागृहाचे काम बदल न करता पूर्ण करावे. वेळेची मर्यादा पाळावी. राज्यात शासकीय तंत्र निकेतन येथील विविध दुरूस्ती, रंगरंगोटीची कामे पूर्ण करावीत, असे निर्देशही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी दिले.बैठकीत बांधकामाधीन, बांधकाम सुरू होणाऱ्या इमारतींचा विस्तृत आढावा घेण्यात आला. बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

२०२४चे पहिल्याच दिवशी कोंढाळीत अग्नी तांडव

पन्नास लाखांचे वर नुकसान

शासनाकडून आर्थिक मदतीची अपेक्षा

काटोल/प्रशांत पवार

नविन वर्षाच्या पहिल्याच दिवशी एक व दोन जानेवारीचे मध्य रात्री दिड वाजता चे दरम्यान कोंढाळी नगर पंचायतीच्या दैनिक बाजारातील दुकानांना आग लागली.

या अग्नितांडवात ०९ते दहा दुकाने अग्नी तांडवाच्या भक्ष्यस्थानी पडले. यात सर्वच दुकानातील सामान जळून खाक झाली.

दिनांक ०१जानेवारी नंतर चे रात्री दीड वाजता अर्थात दोन जानेवारीला कोंढाळी नगरपंचायत मधील दैनिक बाजारचौकातील दुकान चाळीला ??आग.

०८ते १०दुकाने आगेच्या भक्ष्य स्थनी

रात्री दीड चे दरम्यान दुकान चाळीला ?? आग लागल्याची माहिती कळताच कोंढाली येथील नागरीकांनी आग विझविण्यासाठी धाव घेतली. लगतच्या परिसरातील खजगी विंधन विहिरी वरील पंपाने पान्याचा मारा सुरू केला. तो पर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. घटने ची माहिती नगरपंचायत प्रशासक, पोलीस, व राजस्व विभागाला देण्यात आली. तेंव्हा कोंढाळी नगर पंचायत प्रशासक धनंजय बोरीकर यांनी काटोल व वाडी नगरपरिषदेचे व सोलार एक्सप्लोजिव्ह इंडस्ट्रीज चे अग्नीशमन बंब असे तीन तीन फायर ब्रिगेड गाड्या घटनास्थळी पोहोचून आगेवर नियंत्रण करे पर्यंत सर्व ०८ते ०९ही दुकानांच्या साहित्य जळून खाक झाले होते.



या घटनेची माहिती मिळताच प्रशासक धनंजय बोरीकर त्यांचा स्टाफ, अग्नी शमन बंबासह,पोलीस बळ, घटनास्थळी हाजर होऊन स्थानिक नागरिकांचे मदतीने काटोल,वाडी नगरपरिषदे चे व सोलार इंडस्ट्रीज चे अग्नी शमन बंबा ने रात्री ३-३०पर्यंत आगीवर नियंत्रण मिळविले होते मात्र तो पर्यंत येथील अग्नितांडवात सर्व जळून खाक झाले होते. मात्र पहाटे सहा वाजे पर्यंत पर्यंत आग विझवण्याचे काम सुरू होते.

मोठा अनर्थ टळला

रात्री दीड वाजता चे दरम्यान येथील दैनिक बाजार चौकातील एक चाळ आगेच्या कवेत (भक्ष्यस्थानी पडले) असतांना स्थानिक नागरिक, व प्रशासन आगेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सोलार इंडस्ट्रीज, काटोल,व वाडी नगरपरिषदेचे अग्नी शमन बंबाने लागलेल्या आगे नियंत्रण मिळविले अन्यथा दैनिक बाजारातील १००चे वर दुकाने या अग्नितांडवा पासून बचावले . अन्यथा मोठा अनर्थ टळला. मात्र आगेच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या दुकानदारांना ना शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात येत आहे.

कोंढाळी दैनिक बाजारात०१/०२चे रात्री चे अग्नी तांडवात

अफसर पठाण, ओमप्रकाश श्रीवास्तव, आरिफ शेख,शरिफ शेख,कूणाल भांगे,भूषण चांडक, वैभव दूधे,स्नेहल किशोर श्रीवास, नंदु लद्धड यांचे दुकाने पुर्णतः जळालेल्या ची प्राथमिक माहिती असून नुकसानी बाबद राजस्व व पोलीस विभागाचे पंचनामा नंतरच

# नागरिकांनी घाबरु नये, जिल्ह्यात मुबलक पेट्रोल व गॅस उपलब्ध : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**वर्धा ■ प्रतिनिधी**






वाहन चालकांनी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी घाबरुन जावू नये. जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व गॅसचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी गोंधळून जाऊ नये, अफवांवर विश्वास ठेऊ नये, गरज नसेल तर पेट्रोल भरण्यासाठी पंपांवर गर्दी करु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, हिंदुस्थान पेट्रोलिअम व इंडियन आईल कॉर्पोरेशन लिमिटेड या तेल कंपन्यांच्या रिफायनरीमध्ये एलपीजीची वाहतुक करणारे वाहनचालक तसेच इतर पेट्रोलियम पदार्थाची वाहतूक करणारे वाहतुकदार यांनी संप पुकारलेला आहे. जिल्ह्यात दि.२ जानेवारी रोजी पर्यंत ६ लाख ७१ हजार १४१ लिटर पेट्रोल व ७ लाख १३ हजार ३७५ लिटर साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी पेट्रोल टंचाईच्या अफवावर विश्वास ठेऊ नये. पेट्रोलपंपावर गर्दी झाल्यास पोलिस विभागाने पेट्रोल पंपावर पोलिस बंदोबस्त पुरवून पेट्रोलची विक्री करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

# कोलाम आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्राचे वाटप

**वर्धा ■ प्रतिनिधी**

## पीएम जनमन योजना, जिल्ह्यातील ९४ गावांचा समावेश




आदिम जमातीच्या विकासासाठी प्रधानमंत्री जनजाती आदिवासी महान्याय अभियान अर्थात पीएम जनमन योजनेची सुरुवात जनजाती गौरवदिनी करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत कोलाम आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालयाचे जिल्हा प्रभारी विकास रंजन यांच्या हस्ते अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी आर्वीचे उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ, तहसिलदार श्री.काळे, श्री.देवकर आदिवासी विकास निरिक्षक सुहास वैरागडे, शामादादा कोलाम सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी विजय दाभेकर, तलाठी, ग्रामसेवक व महसूल विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांचा योजनेत यात समावेश असून वर्धा जिल्ह्याची यामध्ये निवड करण्यात आली आहे. योजनेंतर्गत जिल्ह्यातील आर्वी, वर्धा, देवळी व हिंगणघाट तालुक्यातील कोलाम बहुल एकुण ९४ गावांची निवड करण्यात आली आहे. आदिम समुदायासाठी अत्यावश्यक असलेल्या विविध ११ सोयीसुविधांच्या कमतरता विविध विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांद्वारे पुर्ण करण्याचे ध्येय योजनेंतर्गत ठेवण्यात आलेले आहे.

यामध्ये आदिम जमातीच्या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामिण), प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आयुष्यमान भारत कार्ड देणे, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, सुकन्या समृध्दी योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, अटल पेंशन योजना इत्यादी योजनांचा लाभ देण्यात येणार आहे.

लाभ घेण्याकरीता लाभार्थ्यांकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. यासाठी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात येत असल्याचे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ यांनी सांगितले.

# मराठी नाट्यक्षेत्राला ऊर्जितावस्था आणण्यासाठी शासन कटिबद्ध : सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार

**वृत्तसंस्था ■ सांगली**

## १०० व्या नाट्य संमेलनाची मान्यवरांच्या हस्ते मुहुर्तमेढ राज्यात ७५ अत्याधुनिक चित्र नाट्य मंदिरे उभारणार नाट्यसंस्कृती जनतेच्या हृदयापर्यंत पोहोचवण्याची अपेक्षा




मराठी नाट्यक्षेत्राला ऊर्जितावस्था आणण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य तथा वने, मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल शुक्रवारी सांगली येथे केले. शतकमहोत्सवी नाट्य संमेलनाच्या मुहुर्तमेढ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

ना. श्री सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव मोठे आहे. मराठी नाट्यपरंपरा प्रगल्भ आहे. १०० व्या नाट्य संमेलनासाठी शासनाने ९ कोटी, ३३ लाख रूपयांचा भरीव निधी उपलब्ध करून दिला असून, या माध्यमातून जिल्हास्तरावर नाट्यसंस्कृती जोपासली जावी.

नाट्य संमेलनाच्या शतक महोत्सवासाठी शुभेच्छा व्यक्त करून सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्राला प्रगल्भ नाट्यपरंपरा आहे. ही नाट्यसंस्कृती रसिकांपर्यंत योग्य प्रकारे पोहोचावी, हा नाट्यसंमेलनाचा उद्देश आहे. मराठी रंगभूमी, नाट्यसंस्कृती जनतेच्या हृदयाच्या सिंहासनापर्यंत पूर्ण शक्तीने पोहोचवावी. शासन नाट्यकर्मींच्या पाठीशी आहे. दर्दी रसिकांच्या पाठिंब्यावर मराठी रंगभूमी एक हजाराव्या नाट्यसंमेलनाचा टप्पा गाठेल. याच विचाराने संबंधित सर्वांनी कृती करावी, असे ते म्हणाले.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, नाटक हृदयापर्यंत आशयभाव पोहोचवते. नाटकामध्ये मेडिटेशन म्हणजेच एकाग्रता करण्याची ताकद आहे. २१ व्या शतकात विविध आव्हानांवर मात करून नाटककार, कलावंत आणि रसिकांनी नाट्यसंस्कृती पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत. नाट्यसंमेलनामध्ये रंगभूमीपुढील आव्हाने व त्यावर मात करण्याबाबत चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, राज्यात ८६ नाट्यगृहे असून त्यापैकी ५२ स्थानिक स्वराज्य संस्थांची आहेत. नगर विकास विभागाकडून सदर ५२ नाट्यगृहांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नरत आहे. त्याचबरोबर राज्यात नवीन ७५ सौर ऊर्जा वापरणारी अत्याधुनिक चित्र नाट्य मंदिरे उभारण्यासाठी मंजुरी प्राप्त असून, नाट्यगृहांमध्ये कलाकार व रसिक प्रेक्षकांना अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच ही नाट्यगृहे अल्प दरात उपलब्ध करून देण्यात येतील, असे ते म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेकाचे औचित्य साधून राज्यातील सर्व जिल्ह्यात त्यांच्या जीवनावरील महानाट्य दाखवण्यात येणार आहे. तसेच, महासंस्कृती अभियानातून स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यात येणार आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येत असून, याअंतर्गत नाटके प्रायोजित करावीत, असे त्यांनी सूचित केले. तसेच नाट्यप्रयोगांसाठी अनुदान देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

विष्णुदास भावे नाट्य विद्या मंदिर येथे आयोजित या कार्यक्रमास कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी, १०० व्या नाट्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल, खासदार संजय पाटील, १०० वे नाट्य संमेलन स्वागत समितीचे अध्यक्ष तथा आमदार सुधीर गाडगीळ, प्रभारी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, मराठी प्रयोग परीनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष विजय गोखले, नाट्य परिषद सांगली शाखाध्यक्ष मुकुंद पटवर्धन आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.सांगलीची नाट्यपंढरी अशी ओळख असून, १०० व्या नाट्य संमेलनाची मुहुर्तमेढ असल्याबद्दल स्वागत व शुभेच्छा व्यक्त करून पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, की सध्या रंगभूमीसमोर इलेक्ट्रॉनिक व अन्य माध्यमांचे आव्हान उभे आहे. मात्र, नाटकांची क्रेझ पुन्हा निर्माण होणे आवश्यक आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून नाट्य संमेलनासाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्याचबरोबर आपणही सांगलीचे पालकमंत्री म्हणून जिल्हा नियोजन समितीमधून १० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. तसेच, विष्णुदास भावे नाट्य विद्या मंदिरास सी.एस.आर. मधून वातानुकुलित यंत्रणेची सुविधा देण्यासाठी प्रयत्न करू, असे ते म्हणाले.

प्रेमानंद गज्वी यांनीही याप्रसंगी यथोचित मार्गदर्शन केले.

१०० व्या नाट्य संमेलनाची मुहुर्तमेढ सांगलीत होत असल्याबद्दल अभिमानाची भावना व्यक्त करून स्वागत समिती अध्यक्ष आमदार सुधीर गाडगीळ म्हणाले, समस्त सांगलीकर आणि नाट्यप्रेमींसाठी ही आनंदाची गोष्ट आहे. आद्य नाटककार विष्णुदास भावे, गोविंद बल्लाळ देवल व कृष्णाजी प्रभाजी खाडिलकर यांच्यामुळे सांगलीची ओळख नाट्यपंढरी म्हणून निर्माण झाली असल्याचे ते म्हणाले.

सध्या नाटकांच्या प्रयोगांमुळे सर्व कलाकारांना एकत्र येणे शक्य होतेच असे नाही. त्यामुळे नाट्य संमेलनाच्या माध्यमातून एकत्र यायला मिळते, असे सांगून ज्येष्ठ रंगकर्मी प्रशांत दामले यांनी नाट्यगृहांची देखभाल, अद्ययावत नाट्यगृहांमध्ये सौर ऊर्जेतून विज पुरवठा व नवोदित कलाकारांची मुंबईत निवास व्यवस्था व्हावी, अशा अपेक्षा व्यक्त केल्या. तसेच, कलाकार म्हणून आम्हीही आमची जबाबदारी पार पाडू, असे ते म्हणाले. अजित भुरे यांनी मनोगत व्यक्त केले

मुकुंद पटवर्धन म्हणाले, दिग्गज कलावंत सांगलीत घडले. सांगलीत हे पाचवे नाट्य संमेलन होत आहे. १०० वे नाट्य संमेलन विभागवार ६ ठिकाणी होणार आहे. या माध्यमातून विविध सांस्कृतिक संस्थांचे प्रमुख एकच व्यासपीठावर आले आहेत. यातून रंगभूमीला नवी दिशा, विचार व नजर मिळेल. सांगलीची आलौकिक नाट्यपरंपरा पुन्हा प्रकाशमय होत असल्याचे ते म्हणाले.

नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह अजित भुरे, उपाध्यक्ष (उपक्रम) भाऊसाहेब भोईर, कोषाध्यक्ष सतीश लोटके, संमेलन समिती प्रमुख विजय चौगुले, साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांच्यासह नाट्यकर्मी, नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वागतगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते नटराजपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. नांदी सादर करण्यात आली. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते शमी, आंबा व उंबराच्या फांद्यांना मुहुर्तमेढ बांधण्यात आली. तसेच संहितापूजन करण्यात आले. प्रशांत दामले यांच्या हस्ते घंटा वाजवून मुहुर्तमेढ करण्यात आली. सदर घंटा ६ विभागीय संमेलनात वाजवली जाणार आहे.दरम्यान, या कार्यक्रमात ज्येष्ठ नाटककार राजेंद्र पोळ यांच्या १० नाट्यकृतींच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विविध पुरस्कारप्राप्त डॉ. तारा भवाळकर, सदानंद कदम, पंडित हृषिकेश बोडस, शाहीर देवानंद माळी यांचा श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**मुनगंटीवार चोवीस तास काम करू शकतातः प्रशांत दामले**

तर श्री प्रशांत दामले यांनी सुधीरभाऊ २४ तासही काम करू शकतात असे सांगताना मुनगंटीवार पहाटे चारपासून सांगलीला येण्यासाठी तयार होते, असे सांगितले. हेलिकॉप्टरमधे सुधीरभाऊंनी दहा-दहा मिनिटांच्या डुलक्या काढल्या. अशा डुलक्या काढल्यास २४ तासही कार्यरत राहण्याचा विश्वास मुनगंटीवार यांना असल्याचे श्री प्रशांत दामले म्हणाले.

**मुनगंटीवार यांची फटकेबाजी**

वनमंत्री असताना मी महाराष्ट्राचा साग आणि वाघ विविध माध्यमांतून जगभर नेला, अस सांगून श्री मुनगंटीवार म्हणाले की, आता शिवरायांनी अफझलखानाचा कोथळा काढताना वापरलेली वाघनखे भारतात लवकरच आणणार आहोत. तमाम भारतीयांसाठी ती प्रेरणादायी गोष्ट ठरणार आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या मुख्य दरवाजाचे लाकूडही आम्ही चंदारपूरहून दिल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले. अजित पवार अर्थमंत्री असले तरी त्यांना नोटा छापण्याकरता लागणारा कागद आमच्या जंगलातील लाकडापासूनच तयार होतो, असे ते म्हणाले.

# संपादकीय...

## रस्म-ए-'उल्का'त...

वर्ष संपता संपता गृहमंत्री अमित शहा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांच्या उपस्थितीत 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' (उल्फा) या संघटनेशी शांतता करार केला.ईशान्य भारतातील रहिवाशांच्या स्व-भावना जोपर्यंत दिल्ली विचारात घेत नाही तोपर्यंत या भागातील संघटनांशी झालेल्या करारांचे यश दीर्घकालीन असण्याची शक्यता फारच कमी.वर्ष संपता संपता गृहमंत्री अमित शहा यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांच्या उपस्थितीत 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' (उल्फा) या संघटनेशी शांतता करार केला. ''आसामसाठी हा दिवस सुवर्णाक्षरांत नोंदवून ठेवण्याइतका महत्त्वाचा आहे,'' असे गृहमंत्री शहा म्हणाले. ते ठीक. त्या राज्याचे मुख्यमंत्री हिमंता सर्मा हे एकेकाळी 'आसाम गण परिषद' या संघटनेचे क्रियाशील सदस्य होते. एकेकाळी या संघटनेने आसामच काय पण संपूर्ण ईशान्य भारतच कसा हादरवून सोडला होता, हे अनेकांस स्मरेल. पुढे त्या संघटनेची शकले झाली. केवळ जनआंदोलनातून आकारास आलेल्या अनेक संघटनांचे हे असेच होते. त्यांस निश्चित अशी राजकीय विचारधारा नसते. त्यामुळे आसाम गण परिषदेचे जे झाले ते अजिबात आश्चर्याचे नाही. या संघटनेतील काही काँग्रेसवासी झाले, काही भाजपच्या धारेस लागले तर काही कालबाह्य झाले. सर्मा राजकीयदृष्ट्या चिवट. बारा पिंपळावरच्या मुंजाप्रमाणे ते अनेक पक्षांचे पाणी पिऊन अखेर च्या उद्धारार्थ भाजपत दाखल झाले. आधी राजीव गांधी यांनी आसाम गण परिषदेशी करार केल्याचेही अनेकांस स्मरेल. ही एवढी पूर्वपीठिका अशासाठी नमूद करायची की त्यामुळे या प्रांतांतील करारांचा इतिहास लक्षात येईल. आसाम गण परिषद पुढे काळाच्या ओघात कालबाह्य झाली आणि त्या संघटनेतील अतिरेकी घटकांनी 'उल्फा'चा घाट घातला. आज ही 'उल्फा' पूर्वीची नाही. तिचीही शकले झाली आणि या शकलांनीही वेळोवेळी करार केले. ही केवळ मतभेदांमुळे होतात तशी शकले नाहीत. तर मोठ्या संघटनेत विविध वांशिक गटांनी आपापल्या स्वतंत्र चुली मांडणे आहे. हे सत्य लक्षात घेतल्यास गृहमंत्री म्हणतात त्या प्रमाणे हा करार सुवर्णाक्षरात नोंदवून ठेवावा असा आहे किंवा काय हे कळेल. त्यासाठी या प्रदेशांच्या करारांचा इतिहास लक्षात घ्यावा लागेल.या प्रदेशांत आतापर्यंत असे डझनांनी करार झालेले आहेत. यातील सर्वात फुटीरतावादी होते ते नागा. स्वातंत्र्य मिळाल्यापासून लगेचच त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न झाला. पहिल्यांदा १९४९ साली, नंतर १९६० आणि १९७५ असे तीन वेळा फक्त नागांशी केंद्राचे करार झाले. दरम्यान १९६० साली या गटांस राज्याचा दर्जा दिला गेला. त्यानंतर १५ वर्षांनी काही भूमिगत नागा संघटनांनी 'शरणागती' पत्करली. पण तरी त्यामुळे राज्यात शांतता नांदू लागली असे नाही. पुन्हा २०१५ मध्ये नागा शांतता करार करावा लागला. याचे कारण यातील प्रत्येक करार हा कोणत्या ना कोणत्या गटाबरोबर होता. करारात सहभागी नसलेला गट अर्थातच त्यास मान्यता देत नसे. हा आणि असाच प्रकार बोडो फुटीरतावाद्यांबाबतही झाला. आसामातल्या आसामात बोडोंस स्वायत्तता देण्याचा प्रयत्न वा त्याबाबत चर्चा झाली. त्यांच्यातही विविध गट आहेत. कोणतेही सरकार एकाच वेळी सगळ्यांशी करार करू शकत नाही आणि एकाशी केलेला करार अन्य मानत नाहीत. हे सरकारला कळत नाही, असे अजिबातच नाही. तथापि 'काही तरी' राजकीय यश मिळवल्याच्या नादात हे असे करार केले जातात. त्याची बातमी होते. संबंधितांकडून हे करार साजरे होतात.पण प्रत्यक्षात जमिनीवरील वास्तव काही बदलत नाही. पश्चिम बंगालचा भाग असलेल्या दार्जिलिंग या डोंगराळ प्रदेशास स्वायत्तता देण्याचा प्रश्न हा याच मालिकेतील. पश्चिम बंगाल सरकार, केंद्र आणि 'गोरखालॅण्ड' मागणारे बंडखोर यांत यावर चर्चेच्या कितीक फेऱ्या झाल्या असाव्यात. पण त्यामुळे गुरखाभूमीचा प्रश्न पूर्ण सुटला असे अजिबात म्हणता येणार नाही. शेजारील त्रिपुरा राज्यातील अनेक संघटनांशी असे काही करार केले गेले. या करारांचे यश तसे अवघडच. याचे कारण ते ज्यांच्याशी केले जातात त्या संघटना बऱ्याच अंशी आंतरराष्ट्रीय टोळ्या आहेत. आंतरराष्ट्रीय याचा अर्थ त्या परिसरातील सीमा सहज ओलांडून या संघटनांचे भूतान, म्यानमार वा बांगलादेश इत्यादी ठिकाणी सहज येणे-जाणे असते. आसामच्या रांगिया शहराच्या मध्यवर्ती भागातून भूतानला ३५-४५ मिनिटांत जाता येते. बांगलादेश, म्यानमार इत्यादी देशांसमवेतच्या आंतरराष्ट्रीय सीमाही इतक्याच सच्छिद्र आहेत. या परिसरांतील अनेक करारांतील त्यातल्या त्यात यशस्वी करार म्हणून १९८६ सालच्या मिझो कराराचा उल्लेख करता येईल. यास इतरांच्या तुलनेत त्यातल्या त्यात यशस्वी असे म्हणता येते याचे कारण हा करार ज्या संघटनेशी झाला त्या 'मिझो नॅशनल फ्रंट' संघटनेचा पाया व्यापक आहे आणि ती केवळ एकाच गटातटाची संघटना नाही. तरीही नंतर यात काही फाटे फुटलेच आणि त्यातील ब्रू आणि हमार वंशीयांशी स्वतंत्र करार करावे लागले. या सगळ्याचा अर्थ इतकाच की या प्रांतांत स्वातंत्र्यापासून आजतागायत शब्दशः डझनांनी करार झालेले आहेत आणि त्यातील एकही करार सुवर्णाक्षराने नोंदवावा वगैरे इतका महत्त्वाचा ठरलेला नाही. एकेकाळी या प्रदेशांतील व्यक्ती राष्ट्रीय स्तरावर चर्चेत असत. लाल डेंगा, लालथानहावला, सुभाष घेशिंग, भृगुकुमार फुकन, प्रफुल्ल मोहंता आदी अनेक नावे सांगता येतील. त्यांच्या संघटनांनी घडवलेले हिंसाचार, बंद वगैरे त्या वेळी वृत्त मथळे ठरत. काळाच्या ओघात यातील काही नेते दिवंगत झाले तर काहींना राष्ट्रीय पक्षांनी आपलेसे केले.तथापि त्या वेळच्या या साऱ्या प्रदेशांतील आंदोलनांची धगदेखील काळाच्या ओघात कमी झाली. असे झाले त्याचे श्रेय कोणत्याही एका 'सुवर्णाक्षरांत लिहून ठेवावे' अशा करारास देता येणार नाही. अनेक छोट्या-मोठ्या करारांनी या प्रदेशातील अनेक लहान-मोठ्या वांशिक गटांस 'शांत' केले. तरीही ते यश पूर्ण नाही. याच प्रदेशातील मणिपूर राज्यात गेले कित्येक महिने जे काही सुरू आहे त्यावरून या सत्याची प्रचीती येईल. कुकी आणि मैती हे मणिपुरातील दोन महत्त्वाचे वंश गट. केंद्रातील सत्ताधीश कधी यास जवळ करतात तर कधी त्यास. त्यातून त्यांचे राजकारण साधले जाते. पण त्या परिसराचे काहीही होत नाही. मणिपुरात तेच दिसून येते. वंश, धर्म इत्यादींच्या पलीकडे जाऊन त्या परिसरातील नागरिकांच्या स्व-भावना जोपर्यंत दिल्ली विचारात घेत नाही तोपर्यंत या अशा करारांचे यश दीर्घकालीन असण्याची शक्यता फारच कमी. ताज्या करारांबाबतही हेच म्हणता येईल.हा करार समस्त 'उल्फा' संघटनेशी झालेला नाही. 'उल्फा'चा संस्थापक प्रकाश बरुआ याचा या करारास विरोध आहे. जवळपास १२ वर्षांपूर्वी तत्कालीन केंद्राशी- म्हणजे मनमोहन सिंग सरकारशी- झालेल्या करारामुळे 'उल्फा' फुटून तिची दोन शकले झाली. गृहमंत्री शहा- सर्मा यांनी केलेला करार 'उल्फा'च्या अरिबद राजखोवा गटाशी आहे. हा गट भारतवादी आणि त्यामुळे केंद्रास हाताळण्यास सोपा. एकत्रित 'उल्फा'ची महत्त्वाची मागणी होती ती त्या राज्यातील सहा विशिष्ट 'इतर मागास' जमातींस 'अनुसूचित जाती/जमाती' असा दर्जा देण्याची. तिचा यात उल्लेख नाही. त्यामुळे हा करार अर्थातच परिपूर्ण नाही. शिवाय याच्या जोडीला नागरिकत्व नोंदणीच्या प्रक्षोभक मुद्द्याची टांगती तलवार आहेच. या प्रश्नांस न भिडता 'उल्फा'शी करार होऊ शकत नाही. तरीही हा अर्धा-मुर्धा करार केला गेला कारण होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकांच्या तोंडांवर काही 'यश' दाखवणे गरजेचे होते. यात गैर काही नाही. तात्पर्य : ईशान्य भारतात असे करार करणे सोपे. राबवणे अवघड. तेव्हा ही रस्म-ए-'उल्फा'त निभावणार कशी हा प्रश्न.

# क्रांतिज्योती सावित्रीमाईंचे विचारधन आपली संपत्तीच!

## (सावित्रीमाई फुले जयंती व महिला मुक्ती दिवस विशेष)...

सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे-पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

'विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन ?'

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षांच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वतः शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा !

'इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे ?
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे ?
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।'

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

'काळरात्र गेली। अज्ञान पळाले ?
सर्वे जागे केले। सूर्याने या ?
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य ?




तेजस्वी अपूर्व। उगवला ?'

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी 'धर्म बुडाला. जग बुडणार' अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

'स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी !
त्यांची गोड वाणी मनी घुमे !!
महार मांगाची करते मी सेवा !
आवडीच्या देवा स्मरूनिया !!'

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

'बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।
मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।
विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।
नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।
शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।
राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।
यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।
'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।
असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।
परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।'

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का ?

प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

!!जयंती निमित्त सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त मो. नं. ७७७५०४१०८६.**

### क्रांतीज्योती...

निवांतपणे ऐकता
सावित्री फुले कथा
जीवन सार कळूनि
साध्य होई सर्वथा

त्या काळीही त्यांना
कळे समाज व्यथा
अंधश्रध्दा शृढरूढी
पायी शृंखला प्रथा

गांजलेली नारीजात
विधवा न् परित्यक्ता
शाळेची कवाडे बंद
नारी भटके विमुक्ता

सावकारी छळवाद
शृंखलाबध्द अशक्ता
मंदीर प्रवेश बंदिस्त
दलीत समाज भक्ता

उच्च नीच भेद भाव
छळे दुर्बला व्यवस्था
समाज मना व्यापली
शिक्षणाची अनास्था

तेधवा क्रांती ज्योती
साथ प्राप्ती अनाथा
इतिहास गाई गोडवे
ध्यानात ठेवी सर्वथा

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

### उत्सुक...

आडूनआडून
बोला
उभे रहाया
उत्सुक
स्पष्ट इच्छा
आतून
आहे बाबा इच्छुक

पार्टी फंड भरलायं
आपले बाजू प्रमुख
रे बलाढ्य उमेदवार
नको उभा सन्मुख

असू द्या लेचापेचा
पुढारी उदयोन्मुख
भरभरू भर झोळी
पाठवूनका विन्मुख

मी साधा कार्यकर्ता
रे प्रसिद्धी परान्मुख
कसा राबे पक्षास्तव
व्हावे जरा अंतर्मुख

प्रचार आधीच चालू
पिंजून काढे मुलूख
तळागळातला नेता
गाळात राही बुडूख

नाराजी नाट्य कला
बाहेर पडे आपसूक
यंदा तिकीट हवे हवे
फासे टाकले अचूक

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

## तालुका काँग्रेस कमिटी व सेवादल काँग्रेस कमिटीचे लाक्षणिक उपोषण चर्चेअंती मागे



**आष्टी (श)वर्धा** ■ शरद शेंद्रे

आज दिनांक :- ०२/०१/२०२४ङ रोजी तालुका काँग्रेस कमिटी तथा सेवादल काँग्रेस कमिटी आष्टी यांच्या वतीने शेती उपयोगी साहित्य जसे मोटर पंप, सोलर बॅटरी मशीन, स्पिंकलर नोझल, मोटर स्टार्टर, आदी वस्तूच्या वाढत्या चोऱ्यांच्या संबंधी पोलीस स्टेशन आष्टी समोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्याचे ठरविले होते परंतु आष्टी पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री.पवार साहेब यांनी विनंती करून चर्चा करण्या करता बोलावले असता, चोऱ्या संबंधित सकारात्मक चर्चा करण्यात आली,आणि चोरीला आळा घालण्याचे १००इ आश्वासन दिले त्यावेळी तिथे प्रामुख्याने रवि गंजीवाले (अध्यक्ष तालुका काँग्रेस कमिटी), संजय शिरभाते,युवराज राऊत (अध्यक्ष तालुका सेवादल काँग्रेस कमिटी),राहुल देशमुख, नामदेवराव झामडे, योगेंद्र पोकळे,राहुल लाड,सोनु माणिकपुरे, जनरावजी नागोसे, योगेश सोनटक्के, अंकुश ढवळे, विलासराव बनाईत,रेहान कुरेशी, इरफान कुरेशी, निलेश चोपडे,चंदू आष्टनकर,एडमवारजी तथा काँग्रेस कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते.

# भीमा कोरेगावची लढाई ही आत्मदन्मानाची हक्काची व अधिकाराची होतीः दिगांबर डोंगरे

**काटोल** ■ प्रशांत पवार

१जानेवारी १८१८ची भीमा कोरेगाव च्या एतिहासिक लढाईत पेशव्यांना चारोचित करून महार बटालियनच्या शुर. महार सैनिकांनी इतिहास घडविला त्या इतिहासाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७साली भीमा कोरेगावला जावून उजाळा दिला व खरा मर्द महार बटालियनच्या सैनिकांच्या पराक्रमाची शौर्य गाथा जगासमोर आणली म्हणून ही लढाई महार सैनिकांच्या आत्मसन्मानाची अधिकाराची व हक्काची होती. असे मत युवा भीम शक्ती संगठन येरला धोटे यांच्या वतीने आयोजित २०६व्या विजयी शौर्य गाथा दिनानिमित्य आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय. स्थानावरून मार्गदर्शन करताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा न प काटोल चे माजी सभापती दिगांबर डोंगरे यांनी व्यक्त केले यावेळेस डॉ बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध व



विजयी स्तंभाला अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा न प चे माजी सभापती दिगांबर डोंगरे होते तर प्रमुख उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शिंदे उपसरपंच रवींद्र साठे वंचित बहुजन आघाडीचे काटोल तालुका अध्यक्ष देविदास घायवट कलन्मा ग्राम पंचायत चे सदस्य आंबेडकरी कार्यकर्ते बळवंतराव नारनवरे माजी सैनिक रामकृष्ण मनोहर पत्रकार नीळकंठ गजभिये सामाजिक कार्यकर्ते तुकाराम देशभ्रतार जेष्ठ कार्यकर्ते रामाजी मनोहर आदी उपस्थित होते यावेळेस उपस्थितांनी भीमा कोरेगाव व आंबेडकरी चळवळीवर आपले मत मांडले.

प्रास्ताविक धनराज ढोके यांनी संचालन हरीश चलपे यांनी तर आभार गौतम बरडे यांनी मानले कार्यक्रमात गौतम बरडे विनोद सहारे हरीश चलपे लेखिराज मनोहर ऋतिक मनोहर सुरज काळबांडे जयेश बोधनकर. अशोक सहारे अजाबराव इंगळे सुशीला सहारे जनाबाई बरडे कमला मनोहर कविता काळभांडे साक्षी बरडे वर्षा बरडे शीला मनोहर विद्या मनोहर प्रीती सहारे यांच्यासह मोठ्या प्रमाणात गावकरी उपस्थित होते.

# हिंगणघाट जिल्हा घोषित करण्याच्या हालचालीला शासन स्तरावर वेग

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे माजी आमदार प्रा.राजु तिमांडे यांना पत्र शैक्षणिक,आरोग्य सुविधा व इतर विकासाच्या बाबतीत हिंगणघाट तालुका माघारलेला

**वर्धा** ■ प्रतिनिधी

हिंगणघाट जिल्हा घोषित करण्याबाबत माजी आमदार प्रा.राजु तिमांडे यांचा अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू आहे तसेच पालकमंत्री सुधीर मनगंटीवार यांची भेट घेऊन जिल्हा घोषित करण्याबाबत चर्चा केली होती व निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्या मागणीचे पत्र पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पुढील कारवाई करिता पाठविण्यात आले आहे त्यामध्ये त्यांनी निवेदनात विशद केलेले मुद्दे विचारात घेऊन हिंगणघाट जिल्हा निर्माण करण्याची विनंती केली आहे त्या अनुषंगाने याबाबत शासन स्तरावर योग्य निर्णय घ्यावा असे विशद करण्यात आले आहे. त्याबाबतचे पत्र माजी आमदार प्रा.राजु तिमांडे यांनासुद्धा पालकमंत्र्याच्या वतीने पत्र नुकतेच पाठवण्यात आले आहे.



या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सुद्धा भेट घेऊन चर्चा केली व हिंगणघाट जिल्हा का हवा आहे आणि सिंधी (रेल्वे) ला तालुक्याचा दर्जा देण्याबाबत संपूर्ण मुद्दे चर्चेदरम्यान पटवून दिले.

वर्धा जिल्ह्याचा परिसर हा आर्वी- आष्टी- कारंजा ते हिंगणघाट-समुद्रपूर तालुक्यातील गिरडच्या टोकापर्यंत

असून लोकसंख्या वाढली आहे. हिंगणघाट परिसराला नागपूर,चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्याच्या सिमा लागल्या असून हायवेचे रोड जोडल्या गेले आहे. यवतमाळ जिल्ह्याचा परिसर वणी तालुका, केळापुर तालुका (पांढरकवडा) ते आणि तालुक्यातील तेलंगणा व आंध्रप्रदेशच्या सिमेपर्यंत असून खुप मोठ्या प्रमाणात व्यापला असून जिल्ह्याची कामे करतांना नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे.

चंद्रपूर जिल्ह्याचा वरोरा, चिमुर तालुका हिंगणघाट परिसराला १५ ते २० किलो मिटर अंतरावर लागून आहे.नागपूर जिल्ह्याचा उमरेड तालुक्याचा परिसर ३० कि.मी. अंतरावर जोडला गेला आहे.हिंगणघाट परिसराला यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर (पांढरकवडा) तालुका, वणी तालुका राळेगाव तालुका लागून आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, चिमुर तालुके जवळ आहे. नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्याचा परिसर सभोवताल आहे.नागपूर ते कन्याकुमारी नॅशनल हायवे नं. ०७ हा हिंगणघाट तालुक्याच्या परिसरातून गेलेला असून मोठ्या प्रमाणात दळण-वळणाची साधने उपलब्ध आहे. नागपूर ते मद्रास रेल्वे-लाईन हिंगणघाट परिसरातून गेली आहे. नागपूर ते चंद्रपूर नॅशनल हायवे आंध्रप्रदेशच्या परिसराला जोडला गेला आहे.

हिंगणघाट परिसराला नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ जिल्ह्याचा परिसर जोडून हिंगणघाट जिल्हा निर्माण होऊ शकतो. लोकसंख्या आणि परिसिमा यांचा भौगोलिक विचार लक्षात घेता हिंगणघाट जिल्हा घोषित करण्यात यावी अशी मागणी माजी आमदार प्रा.राजू तिमांडे यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली होती.त्याबाबत पाठपुरावा सुरू असून शासन स्तरावर जिल्हा घोषित करण्यासंदर्भात वेग आले असून हालचाली सुरू झाल्या आहे.

# जानेवारी महिन्यात महानाट्य व महासंस्कृती आयोजनाची मेजवानी;जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केल्या विविध समित्या

**नागपूर** ■ दिलीप येवले




नागपूरच्या सांस्कृतिक वैभवाला उंचीवर नेणाऱ्या दोन मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी जिल्हावासियांना जानेवारी महिन्यात मिळणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागामार्फत एक महानाट्य व महासंस्कृती मेळाव्याचे आयोजन होत असून या आयोजनासाठी आवश्यक समित्यांची घोषणा आज जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केली आहे.

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र शासनाच्या या बहुआयामी उपक्रमाची सुरुवात नागपूर येथूनच करण्यात येईल, अशी सूचना केली आहे. त्यांच्या सूचनेवरून प्रशासन या आयोजनाची तयारी करीत आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजन करण्यात येत असून विविध प्रांतातील संस्कृतीचे आदान प्रदान, स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चाललेल्या कला संस्कृतीचे जतन, संवर्धन तसेच स्वातंत्र्यलढ्यातील ज्ञात लढवय्यांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाने प्रत्येक जिल्ह्यात महासंस्कृती महोत्सवाचे तसेच महानाट्याचे आयोजन जाहीर केले आहे.कला, साहित्य, संस्कृती क्षेत्रातील देश पातळीवरील विख्यात व्यक्तींचे सादरीकरण या सोबतच स्थानिक कलागुणांना वाव देण्यासाठी महासंस्कृती महोत्सवाच्या आयोजन करण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्रावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तीमत्वावर आधारित महानाट्य आयोजन करण्यात येणार आहे. महानाट्य दोन किंवा तीन दिवसांचे तर महासंस्कृती मेळावा पाच ते सहा दिवसांचा होणार आहे. यासाठी आज जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांच्या मार्गदर्शनातील बैठकीला विभाग प्रमुख उपस्थित होते. रामटेकचे आमदार ॲड.आशिष जायसवाल यांची देखील बैठकीला उपस्थिती होती.

आयोजनासाठी आवश्यक असणाऱ्या कार्यक्रम आयोजन, तांत्रिक मान्यता,वाहतूक , निमंत्रण व प्रसिद्धी विषयक समित्यांची आज घोषणा करण्यात आली. यासंदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत अधिकृतपणे कार्यक्रमांच्या तारखा व येणाऱ्या कलाकारांच्या संबंधीच्या माहितीची घोषणा होणार आहे.

# सारथी संस्थेकडून वसतिगृहासाठी अर्ज आमंत्रित

**नागपूर** ■ दिलीप येवले

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे या संस्थेचे विभागीय कार्यालय नागपूर येथे वनामती परिसरात सुरु करण्यात आले आहे. सारथी मार्फत छत्रपती शिवाजी महाराज जिल्हास्तरीय वसतिगृह संकुल योजनेअंतर्गत खाजगी नोंदणीकृत संस्थाकडून महाविद्यालयातील मराठा, कुणबी या लक्षित गटातील मुला-मुलीसाठी जिल्हानिहाय वसतिगृह चालविण्यासाठी विभागातील सर्व जिल्हयाकरिता अर्ज मागविण्यात आले आहेत. नागपूर विभागामधील सर्व सहा जिल्ह्यातील नोंदणीकृत संस्थांनी जास्तीत जास्त प्रमाणात प्रतिसाद द्यावा, म्हणजे शासनाच्या या योजनेचा मराठा कुणबी या लक्षित गटातील मुला-मुलींना फायदा घेणे शक्य होईल, असे आवाहन उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी, विभागीय कार्यालय, नागपूर यांनी केलेले आहे.या योजनेसाठी मुदतवाढीसह अर्ज करण्याची शेवटची तारीख वर्धा जिल्हा - ६ जानेवारी, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व भंडारा जिल्हा - ८ जानेवारी तसेच गोंदिया जिल्ह्याकरिता ११ जानेवारी, २०२४ अशी आहे. या योजनेची सविस्तर माहिती उपव्यवस्थापकीय संचालक, सारथी विभागीय कार्यालय, वनामती येथील इमारत शरद व ग्रीष्म, व्ही.आय.पी. रोड, धरमपेठ,नागपूर-४४००१० या पत्त्यावर करावे. दूरध्वनी क्रमांक :- ०७१२-२९९२८७८, ई-मेल आयडी :- [illegible]

# जुनी नारसिंगी येथे ग्राम गौरव कलाकारांचा भव्य मेळावा




**नरखेड** ■ अतुल दंढारे

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्य ग्रामीण क्षेत्रातील नारसिंगी जुनी या हनुमान मंदिर येथे मंजुळाबाई वानखेडे बहुउद्देशिय संस्था काटोल व साखळी सुलतान बहुउद्देशिय संस्था पिंपळागांव (रा.) तसेच ग्रामवासी यांचे संयुक्त विद्यमाने ग्राम गौरव कलावंताचा भव्य मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उदघाटक मा.श्री मनोहरराव तायवडे,माजी सरपंच तथा सदस्य ,मा.श्री.राजू भाऊ वानखेडे ,सचिव , मंजुळाबाई वानखेडे काटोल तर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. नितीनजी तायवाडे (समाजिक कार्यकर्ता )आणि प्रमुख अतिथी मा.श्री. संदेशजी गणवीर,सचिव,राष्ट्र संत सम्येक संदेश फॉउंडेशन, सातारा मा.श्री. रवींद्र सोमकुवर,सचिव समता बहुद्देशिय संस्था,श्री. गजानन रेवतकर ,श्री.सुनील मुळेकर, उपस्थित होते.कार्यक्रमामध्ये श्रीमती मंजुळा वानखेडे यांनी हुंडाबळी या विषयावर गायन करून समाजप्रबोधन केलेत.या कार्यक्रमात भजन मंडळ,भारूड, नृत्य, महादेवाचे गाने मंडळ,डहाका मंडळ व इतर मंडळ सहभागी होहून समाजप्रबोधन केलेत.कार्यक्रमाचे रसिकांनी आनंद घेतला.ही लोक कला लोप पावत असून तिचा प्रसार व प्रचार शाहीर राजू वानखेडे सचिव मंजुळाबाई वानखेडे आणि साखळी सुलतान बहुद्देशिय संस्थेचे सचिव विजय दादा वानखेडे यांनी केले तर आभार आशाताई मेंढे यांनी मानले.

# जिल्हा उद्योग केंद्रामार्फत खाजगी व्यक्ती अथवा संस्थेची नेमणूक नाही

**नागपूर** ■ दिलीप येवले

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या रोजगार निर्मिती, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना व इतर सर्व योजना राबविण्यासाठी कार्यालयाकडून कोणत्याही खाजगी व्यक्तीची अथवा संस्थेची नेमणूक केलेली नाही. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी खाजगी व्यक्तीकडून फसवणूक होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. यात फसवणूक झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी कळविले आहे.

# खापरखेडा औष्णिक विघुत केंद्राचा ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजीत क्रिकेट मॅचचे उदघाटन थाटात साजरे

**खापरखेडा** ■ दिलीप येवले





खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०१.०१.२०२४ ला दुपारी १२:३० वाजता प्रकाश नगर वसाहत येथील पंटागणात थाटात क्रिकेट मॅच चे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड यांचा हस्ते उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्य अभियंता प्रशासन प्रभारी प्रविण रोकडे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपमुख्य अभियंता सुदिप राणे, सुरक्षितता अधिकारी उमेश ढोक, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, वर्धापन दिन समितीचे सचिव राहूल बागडे, पुरुषोत्तम मानकर, आदी मान्यवर व्यासपीठावर विराजमान होते.

कार्यक्रमाचे उ ?दघाटक यांचा हस्ते क्रिकेट मॅचचा टॉस करण्यात आला. औष्णिक विद्युत केंद्र २१० मेगावॅट कोळसा हाताळणी विभाग व औष्णिक विद्युत केंद्र ऑपरेशन (संचलन) विभाग यांचा रंगतदार सामना रंगला त्यात संचलन संघाने विजय संपादन केले. प्रथमच कंत्राटी कामगारांसाठी अश्या खेळाचे आयोजन मुख्य अभियंता विजय राठोड यांनी केले. त्यामुळे संपुर्ण कंत्राटी कामगारांनी मुख्य अभियंता यांचे आभार व्यक्त केले. तसेच मुख्य अभियंता विजय राठोड म्हणाले औष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत असलेले संपुर्ण कंत्राटी कामगार हा वीज केंद्राचा कणा आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमात त्यांना सहभाग घेणे अत्यंत गरजेचे आहे. पहिल्यांदाच अश्या सपर्धेचे आयोजन करण्यात आलेले असून खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड यांचे सर्व कंत्राटी कामगार, संघटना, क्रिडा प्रतिनिधी यांनी मनापासून राठोड साहेबांचे आभार व्यक्त करून प्रत्येक वर्षी अश्या स्पर्धा मध्ये कंत्राटी कामगारांसाठी आयोजित करण्यात येईल असे आश्वासन दिले व भविष्यात यापेक्षाही मोठ्या प्रमाणात तसेच जास्तीत जास्त संख्येने कंत्राटी कामगारांचा समावेश करण्यात येईल व क्रिडा क्षेत्रात कंत्राटी कामगारांना संधी देण्यात येईल असे मनोगत मुख्य अभियंता यांनी केले. याप्रसंगी संघटनेचे कंत्राटी कामगार रोशन गोस्वामी, भूपेंद्र चतुर्वेदी, उमेश पारधी, विशाल वांढरे, नरेद्र पुन, सुमेध चव्हाण, आदी उपस्थित होते.

# आनंद मेळावा घेत विद्यार्थी व पालकांना दिल्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा



**सेलू** ■ प्रशांत झाडे

स्थानिक श्री. संत केजाजी कॉन्व्हेन्ट घोराड येथे नवीन वर्षा निम्मित विविध उपक्रम राबवित नवीन वर्षाच्या विद्यार्थी तसेच पालकांना शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थी यांनी नवीन पोशाख परिधान करीत नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश केला. यावेळी शाळेचे संस्था संचालक प्रशांत झाडे यांच्या उपस्थित केक कापत विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सदर दिवसाचे अवचित्त सादत शाळेत आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व पालकांनी तसेच विद्यार्थी यांनी या आनंद मेळाव्याचा आस्वाद घेत नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी शाळेच्या शिक्षिका विद्या वांढरे, सुवर्णा पिसे, शिवानी राऊत , आरती भुरे उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वितरण




**कामठी** ■ नंदू कोल्हे

आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ता स्मृतिशेष दिलीप लक्ष्मणराव वानखेडे यांच्या जयंती प्रित्यर्थ शालेय साहित्याचे वाटप बौद्ध इतिहास संस्कृती संशोधन संस्था पूणे व नागार्जून संग्रहालय पुणे / नागपूर चे संस्थापक स्मृतीशेष दिलीप लक्ष्मणराव वानखेडे यांच्या ६५ व्या जयंती प्रित्यर्थ नवयुवक उच्च प्राथमिक शाळा कामठी व आरोही डिजीटल कॉन्व्हेन्ट स्कूल च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शाळेला डिजीटल फलक व अल्पहाराचे वाटप २ जानेवारीला करण्यांत आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दिक्षाभूमी स्मारक समिती नागपूर चे सदस्य भदंत नागदिपंकर स्थवीर , प्रमुख अतिथी संस्था सचिव पंकज रडके , अर्पणा रडके , कुलदिप दिलीपराव वानखेडे , प्रमोद टेंभूर्णे , शुद्धोधन पाटील , अविनाश वानखेडे , अशोक वानखेडे , संजय वानखेडे , ईश्वर मेश्राम शाळेचे मुख्याध्यापक विजय नंदनवार उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार शेन्डे यांनी तर आभारप्रदर्शन दिलीप मस्की यांनी केले . कार्यक्रम यशस्वीतेसाठी राखी बागडे , मयुरी यादव , नाजुका मानवटकर व विभा सोनडवले यांनी प्रयत्न केले .

# खापरखेडा येथे आज रक्तदान शिबिर

**खापरखेडा** ■ दिलीप येवले

खापरखेडा औष्णिक विघुत केंद्राचा ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ०३.०१.२०२४ ते दिनांक ०५.०१.२०२४ पर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन मनोरंजन क्लब क्रमांक १, खापरखेडा येथे करण्यात आलेले आहे. या रक्तदान शिबिराचे उदघाटन खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड यांचा हस्ते करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगारांनी रक्तदान करावे असे आव्हान वर्धापन दिन समितीने केलेले आहे.

# हिट अँड रन कायद्याच्या विरोधात वाहन चालकांचा एल्गार

## कायद्या रद्द करण्याची वाहन चालकांची तहसिलदारमार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदन मागणी;४ जानेवारीला चक्का जाम आंदोलनाचा इशारा

**समुद्रपूर** ■ अमोल झाडे



समुद्रपुरः केंद्र सरकारने वाहन चालकावर नवीन हिट अँड रन वाहन कायदा लागू केलेल्या या कायद्याच्या विरोधात समुद्रपुरात वाहन चालकांनी एल्गार पुकारला असुन कायदा रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदार कपिल हाटकर यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना पाटविले असुन कायद्या रद्द झाला नाही तर ४ जानेवारी चक्का जाम आंदोलन करण्याच इशारा सरकारला दिला आहे.सदर कायद्यामध्ये वाहन चालकांकडून जर अपघात झाला तर त्या ७ लाख रुपये दंड आणि दहा वर्षाची सजा अशी तरतूद करण्यात आली आहे. त्या कायद्यामुळे संपूर्ण वाहन चालकांमध्ये एक भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे आणि जर त्यांच्याकडून अवधानाने अपघात झाला तर त्यांच्याकडे ७ लाख रुपये कुठून येणार असा प्रश्न पडला आहे. सर्व वाहन चालक कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी वाहने चालून आपले कुटुंब चालवतात आणि त्याचमुळे देशात दळवळनाची सुविधा सुखकर आहे. जर गाडी चालवायला वाहन चालक नसतील तर दळण वळण कसे होणार याकडे सरकारने लक्षात घ्यावे, सर्व बाजारपेठा, शेतकरी, औषधी, पेट्रोल पंप दैनदिनचालणारी दळणवत कसी चालणार यांचा सरकार ने विचार करावा. केंद्र सरकारन वाहन चालकाच्या विरोधात जाऊ त्यांना दबावात आणत आहे आणि त्यांच्या रोजी रोटी वर त्यांनी प्रश्न निर्माण करत आहे. कोणताही चालक अपघात घडवून आणत नाही तर आतापर्यंत अनुभवानुसार काही समोरील व्यक्ती सुद्धा वाहनासमोर येऊन अपघात करतात यामध्ये ड्रायव्हर यांची काहीही चूक नसतात जेव्हा अपघात होते चालकाला त्याठिकाणी असलेला जमावाचा रोष लक्षात घेऊन आपला जीव वाचविण्यासाठी पळ काढावा लागतो तरी केंद्र सरकारने वाहन चालका विरोधातील नवीन हिट अँड रन कायदा रद्द करुन चालकाना यांना न्याय देण्यात यावा अन्यथा सर्व वाहन चालक रस्त्यावर उतरणार आणि ४ तारखेला चक्काजाम करणार असा इशारा तहसिलदार कपिल हाटकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री ऐकनाथजी शिंदे, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, परिवहन मंत्री यांना दिलेल्या निवेदनातून दिला.निवेदन देतेवेळी जाकीर अगवान,परवेश काजी,आरीफ शेख,राजु गुंडे,विजय गुंडे,दिनेश गलांडे,मनोज गलांडे,रामु मडावी, मंगेश खाटिक, मंगेश वगारहांडे,संदिप कापसे आदिंसह तालुक्यातील संपूर्ण वाहन चालक उपस्तिथ होते.

# विद्यार्थ्यांनी आदर्श नागरीक बनुन देशाचे उज्वल भवितव्यासाठी समाजात कार्यरत राहावे:ठाणेदार सुनिल दहिभाते

**समुद्रपूर** ■ अमोल झाडे



समुद्रपूरः तालुक्यातील गिरड पोलिस ठाण्याच्या वतीने महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त कोरा येथिल विकास विद्यालयात रेजिंग डे चे आयोजन करण्यात आले होते . यावेळी ठाणेदार सुनिल दहिभाते यांनी विद्यार्थ्यांना पोलीसांचे कामकाज व त्यांचे कार्य काय आहे.तसेच कायदेविषयक मार्गदर्शन करीत म्हणाले की देशाचे उज्वल भवितव्य घडविण्याचे सामर्थ्य असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आदर्श नागरीक बनुन समाजात कार्यरत राहावे. विद्यार्थ्यांनी विद्यार्थीनींनी शिक्षणाला अधिकाधिक महत्त्व द्यावे.सोबत समाज घडत असलेल्या चांगल्या गोष्टींची जतन व वाईट गोष्टीच्या दुरु रहावे. तरच शैक्षणिक क्षेत्रात वर्तमानात घेतलेले खडतर श्रमामुळे भविष्यातील दिवस सुखासमाधानाचे जातील. सामाजिक बांधिलकी जपून समाजहीत व राष्ट्रउत्कर्षासाठी योगदान दिले पाहिजे.युवकांनी व्यसनाधिनतेच्या गर्तेत न सापडता सुसंस्कारक्षम मार्गाने वाटचाल करावी. मुलींनी अन्याय अत्याचार व छेडछाड निमुटपणे सहन न करता त्याबाबतची पोलीसांना, पालकांना ताडीने माहिती द्यावी. जेणेकरुन योग्य वेळी योग्य त्या कारवाईच्या दृष्टीने पावले उचलली जातील. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन सदैव दक्ष आहे.असे मत ठाणेदार सुनिल दहिभाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.यावेळी पोलिस कर्मचारी कृष्णा हुरर्ल, शंकर नैताम,माजी पोलीस पाटील इंद्रपाल आटे,कोरा येथिल विकास विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोराडी मंदिराचा प्लास्टिक पिशवीवर बंदीचा निर्णय;प्रदूषण टाळण्यासाठी सकारात्मक पाऊल

**नागपूर** ■ दिलीप येवले

**श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाचे अध्यक्ष मा. आ. श्री. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात आणि संस्थेचे सचिव श्री. दत्तु समरीतकर यांच्या नेतृत्वात मंदिर प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. संस्थान भाविकांना उत्तम सोयीसुविधा प्रदान करण्यासाठी कार्यतत्पर आहे. आता आई श्री. महालक्ष्मी जगदंबेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी पर्यावरणाचा विचार आत्मसात करावा आणि पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन संस्थानाच्या वतीने करण्यात आले आहे.**

सिंगल युज्ड प्लास्टिकमुळे कोराडी देवी मंदिराच्या सौंदर्याला होणारा धोका टाळण्यासाठी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाने प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. संस्थानाचे सचिव श्री दत्तुजी समरीतकर यांनी याबाबत माहिती दिली.

कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला भेट देणाऱ्या भाविकांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. नुकताच १ जानेवारी रोजी संस्थानाने भक्तांच्या दर्शनाचा रेकॉर्ड ब्रेक आकडा नोंदवला असून, अशात संस्थानाचे सौदर्य अबाधित ठेवण्याचे आव्हानही निर्माण झाले आहे. या मंदिर परिसरातील खाद्यपदार्थ प्रसिद्ध असल्याने भक्तही त्याचा आवर्जून आस्वाद घेतात. परिणामी सिंगल यूज्ड प्लास्टिक पिशव्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याचे निदर्शनात आल्याचे श्री दत्तुजी समरीतकर म्हणाले. शिवाय संस्थानातर्फे निर्माल्याचे जसे सेंद्रीय खत तयार केले जाते तसे प्लास्टिक पिशव्यांचे नियोजन करताना मंदिराच्या कचरा व्यवस्थापन विभागाला अनेक अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मंदिराच्या ५ किमी परिसरात प्लास्टिक बंद खाद्यपदार्थ, पूजेच्या साहित्यासाठी उपयोगात येणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांवर मंदीर प्रशासन कडून बंदी घातली आहे. तसेच मंदिर परिसराच्या २ किमी परिसरात अनधिकृत दुकाने लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे श्री दत्तुजी समरीतकर म्हणाले.

# जनसामान्यांचा आशिर्वाद हिच माझी खरी संपत्ती:शहरातील जनसंपर्क कार्यालयात अभिष्टचिंतन सोहळ्यात आमदार कुणावार यांचे प्रतिपादन



**समुद्रपूर** ■ अमोल झाडे

समुद्रपुरः सर्वसामान्यासाठी माझी सतत धडपड सुरू असते त्या जनसामान्यांचा आशिर्वाद हिच माझी खरी संपत्ती आहे असे मत हिंगणघाट विधानसभा श्रेत्राचे कार्यसम्राट आमदार समिरभाऊ कुणावार यांनी समुद्रपुर शहरातील जनसंपर्क कार्यालयात आज सोमवारी १ जानेवारी सायकांळी अभिष्टचिंतन सोहळ्यात व्यक्त केली भारतीय जनता पक्ष व समुद्रपुर शहरातील नागरिकांच्या वतीने आमदार समिरभाऊ कुणावार यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, विधानसभा प्रमुख संजय डेहणे, जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे,जिल्हा उपाध्यक्ष योगेश फुसे तालुकाध्यक्ष वामनराव चंदखेडे,रमेशभाऊ भोयर, मंडळ अध्यक्ष गजानन राऊत, विनोद विटाळे,डॉ,उमेश तुळसकर प्रा मेघश्याम ढाकरे, श्रीकांत महाबुधे , शहर अध्यक्ष राम काळे,युवा मोर्चा अध्यक्ष आशिष अंडरस्कर,सरपंच संघटना अध्यक्ष राजू नौकरकर उपस्थित होते

यावेळी शेकडो नागरिकांनी आमदार समिरभाऊ कुणावार यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी येथिल नागरिकांचे व कार्यकर्ते प्रेम पाहून आमदार समिरभाऊ कुणावार भाराऊन गेले व ते पुढे म्हणाले की माझी खरी ताकद आपण सर्व जिवाभावाचे सहकारी व गोरगरीब जनता आहे हिच माझी खरी कमाई असुन त्यांचा आशिर्वाद हिच संपत्ती आहे असे भावनापूर्ण उदगार काढले आमदार समिरभाऊ कुणावार यांनी काढले.यावेळी विविध संघटना, वाघाडी फाउंडेशन,नगरपंचायत चे पदाधिकारी,विद्या विकास महाविद्यालय, सिंदी रेल्वे येथील उपाध्यक्ष मुरर्लिधर चौधरी, कोषाध्यक्ष जगदीश वरटकर , शेषराव तुळणकर, अंकुश खुरपडे, बलराम राऊत , नगरपंचायत चे पाणी पुरवठा सभापती ललित डगवार, गटनेते विकि बारेकर,राजाभाऊ उमरे,माजी नगराध्यक्ष शीला सोनारे, वर्षा बाभूळकर, नगरसेविका सौ वनिता झाडे,सीमा काळे सुशीला लढी, आरती कुडे,मोनिका बेलेकर,ताराबाई अडवे ,सुषमा चिताडे, वनिता कांबळे, जया कोराम, नमिता पाठक,अन्नपूर्णा उमरे रविंद्र लढी,नारायण बादले, सुनिल रोकडे,रजत भुरे,विजय झाडे,प्रफुल कुडे,अनुराग चौधरी, अक्षय उमाटे, वृषभ झाडे,दिवाकर मडकाम ,पंकज बेलेकर,प्रसाद पंत ,अनिल बावणे दिनेश जाधव, विठ्ठल झाडे, कुणाल बोधे,प्रवीण चौधरी, अमोल हिवज,देवराव खोब्रागडे, गजानन तळवेकर, विनोद बाभूळकर, आदिंसह भारतीय जनता पक्षाच्या विविध संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते इत्यादी नि परिश्रम घेतले.

# मातीतला खेळ जपा, त्यामुळे देह आणि मन हि जपल्या जाईल अतुल वांदिले यांच्या हितोपदेश

## नंदोरी येथे भव्य कब्बडी स्पर्धेच्या बक्षिस वितरण सोहळ्याला राष्ट्रवादीचे अतुल वांदिले यांची उपस्थिती



**हिंगणघाट** ■ अब्दूल कदीर बख्श

हिंगणघाट :- सार्वजनिक व्यायाम प्रसारक मंडळ नंदोरी द्वारा आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले, उद्घाटन महेशजी झोटिंग पाटील, संजयजी डेहणे उपस्थित होते. यावेळी आयोजन मंडळाच्या वतीने मान्यवरांचे पुष्पागुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांनी मनोगत व्यक्त करत कब्बडी हा मातीतील खेळ आहे. या खेळातून अनेक खेळाडूंनी आपले नाव राष्ट्रीय स्थरावर नेऊन मातीतला खेळ आजही जपत आहे, त्यामुळे देह आणि मन हि जपल्या जाईल असा हितोपदेश दिला. तसेच सार्वजनिक व्यायाम प्रसारक मंडळाचे आभार मानले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे समुद्रपूर तालुका अध्यक्ष महेश झोटिंग पाटील, भाजपचे संजय डेहणे, जिल्हा सरचिटणीस दशरथ ठाकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश वैरागडे, किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत गौळकर, माजी जि.प.सदस्य भिमरावजी झुलझेले, माजी सरपंच सुधीर गोठे, गजानन बोरेकर, डॉ. प्रविण खेळकर, मंडळाचे अध्यक्ष अशोक सुमटकर, सचिव देवनाथजी बोरूटकर, संतोष घोडे, शरद सावरकर, अरुण सावरकर, सचिन हिवरकर, संजय पावडे, नितीन चौधरी, महेश गोठे, सुरेश आडे, मयूर गोठे आदी उपस्थित होते.

# सावंतवाडी येथे शिक्षकेतर महामंडळाचे ५१ वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवारी

**कामठी** ■ नंदू कोल्हे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटना महामंडळाचे ५१ वे राज्यस्तरीय अधिवेशन व चर्चासत्र ७ जानेवारी रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे मंत्री महोदय यांच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे. या अधिवेशनासाठी शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन शिक्षकेतर संघटना महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी केले आहे.

सावंतवाडी जिल्हा रत्नागिरी येथील सावंतवाडी जिमखाना मैदान येथे होत असलेल्या शिक्षकेत्तर महामंडळ अधिवेशनासाठी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, केंद्रीय मंत्री नारायण राणे, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, खासदार विनायक राऊत, शिक्षक आमदार विक्रम काळे, आमदार जयंत आसगांवर, वैभव नाईक, रवींद्र धंगेकर, नितेश राणे, रमेश पाटील, निरंजन डावखरे, सत्यजित तांबे, ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार सुधीर सावंत, शिक्षण उपसंचालक महेश चोथे यांच्यासह विविध विभागांचे आमदार, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे काही प्रश्न मार्गी लागले असले तरी अद्याप अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहेत. याच अनुषंगाने खुले अधिवेशन व चर्चासत्र होणार असून, या चर्चासत्रात हक्काच्या मागण्या मान्य करण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अधिवेशनास उपस्थित रहावे असे आवाहन शिक्षकेतर संघटना महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांच्यासह नागपूर जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे नागपूर विभागीय कार्यवाह जीवन सारवे, माजी कार्यवाह उमेश शेंडे, मनोज पराते, सतिश दहाट, गणेश मानकर, लीलाधर देविकर, कवीश्वर खडसे, रॉबीन मोरडे यांनी केले आहे.

# रामटेकच्या खेळाडूंची तेलंगणा येथे झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेत उंच भरारी;२४ खेळाडूंनी पटकावले गोल्ड सिल्वर आणि ब्रांच मिडल



**रामटेक** ■ नंदू कोल्हे

रामटेक - नागपूर जिल्ह्यातील प्रसिद्ध रामटेक या तालुक्यामधील तेलंगणा असोसिएशन तर्फे आयोजित केलेल्या चौथ्या थाई बॉक्सिंग नॅशनल चॅम्पियनशिप २०२३ स्पर्धेत महाराष्ट्रात हाय बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष व नॅशनल रेफ्री अजय खेडकर सर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व नेतृत्वात लालबहादूर स्टेडियम हैदराबाद यामधील २४ खेळाडूंनी गोल्ड सिल्वर आणि ब्रांच मिडल पटकावले आहे हे विशेष. फर्स्ट साऊथ एशियन थाय बोकसिंग स्पर्धेत निवड झाली. नुकत्याच झालेल्या स्पर्धेत रामटेकच्या विद्यार्थ्यांनी तेलंगणात आपली यशस्वी कामगिरी करून रामटेकचे नाव रोशन केले त्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. बँकोट स्टेडियम काठमांडू नेपाली या ठिकाणी स्पर्धा पार पडली त्या स्पर्धांमध्ये सात देशांचे २५०खेळाळुनि भाग घेतला त्या मध्ये भारताच्या गुरुकुल स्पोर्ट्स अकॅडमी नागपूर जिल्ह्याचे सचिव अजय खेडकर सर यांच्या मार्गदर्शनामध्ये खेळाडू मुला-मुलींनी ११ गोल्ड आणि दहा सिल्वर पटकावण्यात आले भारताचे नाव नेपाल या देशात गाजवण्यात आले श्रेयस मोरे गोल्ड मेडल नंबर दोन शिवांश यादव गोल्ड मेडल नंबर तीन ईशान नाव नवरे गोल्ड मेडल नंबर चार अन्वेष ठवरे गोल्ड मेडल पवन बाजनघाटे ,गोल्ड मेडल मोहम्मद आदिल ,गोल्ड मेडल नंदिनी पाटील, गोल्ड मेडल वदेही टेकाम ,वंशिका राहाटे गोल्ड मेडल माहि जथरे, पुजा ममाडिया ,अविनाश चांदेकर, मिहान गणवीर प्रज्ज्वल अजबेले ,देवयानी यादव ,अरोषि खोब्रागडे सिल्वर मेडल सिल्वर यथार्थ दमाहे ,पियुष सोनोडिया सिल्वर मेडल ,प्रतीक घोनाडे ,चंद्रशेखर अतकरी ,आनंद यादव महाराष्ट्रात हाय बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष ध व नॅशनल रेफ्री अजय खेडकर सर महाराष्ट्र रेफ्री चंद्रशेखर अतकरी महाराष्ट्र रेफ्री अविनाश चांदेकर या संपूर्ण खेळाडू आणि रेफ्री यांचे स्वागत डेंजर बॉक्सिंग असोसिएशन अध्यक्ष राजू श्रेष्ठ बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष संतोष खेरणार व सचिव पाशा अत्तर यांनी स्वागत केले. ब्युरो रिपोर्ट जिल्हा प्रतिनिधी राकेश मर्जीवे आदींची उपस्थिती होती.

# स्मृतिशेष दिलीप लक्ष्मणराव वानखेडे यांच्या जयंती प्रित्यर्थ शालेय साहित्याचे वाटप




**कामठी** ■ नंदू कोल्हे

स्मृतिशेष दिलीप लक्ष्मणराव वानखेडे यांच्या जयंती प्रित्यर्थ शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.बौद्ध इतिहास संस्कृती संशोधन संस्था पूणे व नागार्जून संग्रहालय पुणे / नागपूर चे संस्थापक स्मृतीशेष दिलीप लक्ष्मणराव वानखेडे यांच्या ६५ व्या जयंती प्रित्यर्थ नवयुवक उच्च प्राथमिक शाळा कामठी व आरोही डिजीटल कॉन्व्हेन्ट स्कूल च्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शाळेला डिजीटल फलक व अल्पहाराचे वाटप २ जानेवारीला करण्यांत आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दिक्षाभूमी स्मारक समिती नागपूर चे सदस्य भदंत नागदिपंकर स्थवीर , प्रमुख अतिथी संस्था सचिव पंकज रडके , अर्पणा रडके , कुलदिप दिलीपराव वानखेडे , प्रमोद टेंभूर्ण , शुद्धोधन पाटील , अविनाश वानखेडे , अशोक वानखेडे , संजय वानखेडे , ईश्वर मेश्राम शाळेचे मुख्याध्यापक विजय नंदनवार उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार शेन्डे यांनी तर आभारप्रदर्शन दिलीप मस्की यांनी केले . कार्यक्रम यशस्वीतेसाठी राखी बागडे , मयुरी यादव , नाजुका मानवटकर व विभा सोनडवले यांनी प्रयत्न केले .

# विद्यार्थ्यांकरिता ' जीएस- उड्डाण ' एकदिवसीय खुले व्यासपीठ गो . से . महाविद्यालयाचे आयोजन

**वर्धा** ■ प्रतिनिधी



शालेय अभ्यासक्रमासोबतच विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा , याकरिता गो . से वाणिज्य महाविद्याल यात कनिष्ठ महाविद्यालयातील आणि दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता ' जीएस- उड्डाण ' अंतर्गत २ ९ डिसेंबर शुक्रवारी जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे . गो . से . वाणिज्य महाविद्यालयात होणाऱ्या या एकदिवसीय स्पर्धांमध्ये वक्तृत्व , निबंध , व्यावसायिक प्रश्नमंजूषा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे . कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता ' शब्दापेक्षा कृती श्रेष्ठ ' हा वक्तृत्व स्पर्धेचा विषय असून हिंदी , मराठी व इंग्रजी या भाषेत वक्तृत्व करता येणार आहे . तर निबंध स्पर्धेकरिता ' आजच्या जगात गांधीवादी तत्त्वांची प्रासंगिकता ' हा विषय देण्यात आला आहे . तसेच दहावीच्या विद्यार्थ्यांना माझ्या जीवनाचे ध्येय ' या विषयावर चित्र काढायचे आहे . तर ' मोबाइलचा जीवनावर होणारा परिणाम ' या विषयावर निबंध लिहायचा आहे . हिंदी , मराठी व इंग्रजी कोणत्याही भाषेत निबंध लिहिता येणार आहे . या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता एका शाळा , महाविद्यालयातून केवळ दोन विद्यार्थ्यांनाच भाग घेता येणार आहे . विजेत्यांना पुरस्कारही प्रदान करण्यात येणार असून या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन गो . से . वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ . अरुंधती निनावे यांनी केले आहे .

# गाव स्वच्छ ठेवण्याचा संकल्प



**कामठी** ■ नंदू कोल्हे

माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेश भोयर यांच्या आवाहनावरून येरखेडा ग्रामपंचायत सरपंच सरिताताई रंगारी यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत सदस्य अनिल यांच्या वाढदिवस व नवीन वर्षाच्या निमित्ताने प्रत्येक गावात व शहरात स्वच्छता मोहीम राबविण्याचा संकल्प करण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य मोहम्मद इम्रान नईम, नाजीस परवीन, सतीश डहाट, गीताताई परतेकी, सय्यद रशिदा बेगम, अर्चनाताई सोनेकर तसेच ग्रामस्थ सय्यद गुलफान, कमलेश बागडे, नसरू भाई, निर्मल वानखेडे, बाल्या वाडे, राजेश बन्सीगे, बाल्या लुटे, अमित लुटे यांचा समावेश होता. भोयर.आदींनी गाव घर स्वच्छ ठेवण्याची शपथ घेतली.

# बालाजी नगर मुख्य रस्ता व नाली बांधकामाचे भूमिपूजन




**कामठी** ■ नंदू कोल्हे

सरपंच ग्राम पंचायत रनाळा आज वार्ड क्रं २ बालाजी नगर रनाला येथे क्ष्मा क्षआमदार क्ष्श्री क्षचंन्द्रशेखरजी क्षबावनकुळे क्षसाहेब व क्षआमदार क्षटेकचंदजी क्षसावरकर क्षसाहेब यांच्या सहकार्याने व क्षसरपंच क्ष्श्री क्षपंकजभाऊ क्षसाबळे क्षयांच्या क्षप्रयत्नाने २५ क्लक्ष क्षरूपये-बालाजी नगर येथील मुख्य रस्ता सीमेंट कॉन्क्रीट रोड चे क्ष्भूमिपूजन क्षसरपंच मा श्री पंकज भाऊ साबळेङ यांच्या हस्ते संपन्न झाले...

या भूमिपूजन सोहळ्याला... ग्राम पंचायत सदस्य स्वप्निल ब. फुकटे, आमिर खान, सदस्या स्मिताताई भोयर, सुनीताताई नंदेश्वर, तसेच रमेशजी बोरकर, अशोकजी वाघमारे, कैलाशजी ऊईके, बोंद्रे काकाजी, टोप्पो अंकल, वाल्टर अंकल, पौनीकर काकाजी, लकड़ा अंकल, पिल्ले अंकल, नामदेवजी नीमकर, शेळके काकाजी, नवनावगेजी, मंगेश बोंद्रे, मंगेश लांजेवार, राधेश्याम कुल्लरकर, अजय आदिवान, जीतु पौनीकर, राकेश शुक्ला, बहोंरीया भैया, सूरज लक्षणे, विजय आगाशे, विकास शेबे, अमर गावंडे, लोखंडे काकाजी, प्रणय गिरी, सागर कोसुळकर, गावंडे काकू, लांजेवार काकु, बोरकर काकू, बोंद्रे काकु, वाघमारे काकू, लक्षणे काकू, पौनीकर काकू, नवनाथ ताई, आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील व्ही .जे.एन.टी.व ओ.बी.सी. चे केंद्रीय ओ.बी.सी.जात यादित समावेश करणारः हंसराज अहिर

## व्ही. जे.एन.टी , बेलदार शिष्टमंडळाशी चर्चा

**चंद्रपूर** ■ नंदू कोल्हे




महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती व ईतर मागासवर्गीय समाज समुहाचे उपजाती ,तत्सम समाज महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे शिफारशी नूसार २६जून२००८ व२००९,२०११,२०१३ त्यानंतर सुधारित शिफारस ३० जानेवारी२०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे शिफारशी नुसार १४ समाजाचे उपजाती/तत्सम समुह व अनेक समुहाचे उपजातीना त्या त्या समाजाचे मागणी नुसार महाराष्ट्रात विमुक्त जाती भटक्या जमाती व ईतर मागासवर्गीय प्रवर्गात समावेश केलेले होते. परंतु तब्बल १० वर्ष लोटून गेले तरीही भारत सरकारचे राष्ट्रीय ओ बी सी. जात यादित सदर समाज समूहाचे उपजातींची नावे समाविष्ट केलेले नाही आखिलं भारतीय घुमंतू जनजाती वेलफेअर संघ दिल्ली महाराष्ट्र प्रदेश व विदर्भ बेलदार व तत्सम समाजा संघटना व विविध समाज संघटनानी वेळोवेळी निवदने सादर केल्याने राष्ट्रीय ओ. बी. सी. आयोग भारत सरकार दिल्ली चे अध्यक्ष मान.नाम. श्री. हंसराज अहीर पद स्वीकारल्या नंतर लगेच आयोगाचे सर्व सदस्य केंद्रीय आयोगाचे अधिकारी व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष व सचिव सदस्य तसेच महाराष्ट्र शासनाचे सचिव व विविध लाभार्थी समाज संघटनेचे अध्यक्ष व शिष्टमंडळ यांचे समवेत मागील २१ऑक्टोबर २०२३ ला सह्याद्री शासकीय अतिथीगृहात मुंबई येथे सुनावनी घेऊन दरम्यान सर्व शिष्टमंडळ चे ऐकून घेऊन प्रकरणे निकाली काढून महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिलेले व विमुक्त जाती भटक्या जमाती तसेच ईतर मागासवर्गीय समाज समुह समाजाचे स्वीकारलेले सर्व जाती व उपजाती/तत्सम समुह केंद्रीय जात यादित समावेश करण्याचे प्रक्रिया पुर्ण करण्याचे निर्देश संबंधीत विभागाचे अधिकारी याना दिलेले आहे. परंतू महाराष्ट्र शासनाचे सचिवा मार्फत महाराष्ट्र जाती गॅझेट मध्ये आलेले समूहाचे मराठीतील नाव इंग्रजीत व हिन्दी मध्ये अनुवादित यादी तयार करणे व काही तांत्रिक बाबी पुर्ण झालेले नसल्यामुळे उशिर होत आहे.व ती प्रक्रिया लवकरच पुर्ण होऊन सदर जाती समुहाचे समावेश केंद्रीय ओ.बी.सी.जात यादित समावेश करणयास राष्ट्रिय ओ.बी.सी. आयोग तसे रितसर अहवाल लवकरच भारत सरकार ला शिफारस करणार आहे.व हे काम अंतिम टप्पयात आहे असे आश्वासन मान.श्री हंसराज अहीर यांनी अखिल भारतीय विमुक्त जाती भटक्या जमाती संघटना चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष विदर्भ बेलदार समाजाचे उपजाती व ओ.बी.सी. समन्वयक नेते आनंदराव वाय. अंगलवार, विदर्भ बेलदार व तत्सम समाजाचे प्रांतीय अध्यक्ष चंद्रशेखर कोटेवार यांनी एका शिष्टमंडळा द्वारे राष्ट्रीय ओ बी सी आयोगाकडे प्रलंबीत मागणी बाबत पाठपूरावा करणयासाठी गेले , राष्ट्रिय ओ.बी.सी.आयोगाचे अधय्क्ष तथा माजी केंद्रीय मंत्री मान.हंसराज अहीर साहेब याचे शी भेट घेऊन चर्चा केले असता प्रस्ताव संदर्भात अहवाल अंतिम टप्यात आले व लवकरच आयोगाचे स्वीय सचिवांना मुंबई ला पाठवून पाठपूरावा करण्याचे आशवासन दिले. या प्रसंगी विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# शाहीर कलाकार तर्फे चंद्रपत्ल चौकसे यांचा सत्कार



**रामटेक** ■ नंदू कोल्हे

रामटेक - चंद्रपाल चौकसे ,पर्यटक मित्र, रामधत्म मनसर यांना आज १ जानेवारी ला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा भारतीय कलाकार शाहीर मंडळ तर्फे मानाचत फेटा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी शाहीर राजेंद्र बावनकुळे, भगवान लांजेवार, चिरकुट पुंडेकर ,अरुण मेश्राम ,शिशुपाल अतकरे ,रवींद्र मेश्राम,युवराज अडकणे,सौ विमलबाई शिवारे,सौ अरूणा बावनकुळे,नाना ठवकर, प्रेमलाल भोयर,श्रावण लांजेवार,योगेश सांगोडे,प्रकाश जौंजाल, सुनीता हिवरकर,अंजना मस्के,इंदुबाई ठेंभरे,अंजना मानकर,बेबी साखरे,सोनाबाई कुरडकर,यशोदा सोमनाथे,दशरथ भडंग,संभाजी लक्षणे,आणि शेकडोच्या संख्येने शाहीर कलाकार उपस्थित होते.

# मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी एमएसआरडीसी, पीडब्ल्यूडी, एनएचएआयने समन्वय वाढवावा;उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

## ठेकेदाराकडून गतीने काम होत नसल्यास त्याला काळ्या यादीत टाका;नागरिकांचा त्रास टाळण्यासाठी कामे युद्धपातळीवर पूर्णत्वाला न्यावी

**दै, जनप्रभात मराठवाडा**
**उपसंपादक ▮ राठोड रामेश पांडित**



मुंबई:- दि. २ जानेवारी - मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर काँक्रीटीकरणासह विविध पूल आणि सेवा रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर सुरु असल्यामुळे वाहतूक कोंडी होऊन प्रवाशांना त्रास होत आहे. ही वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक नियोजनासह सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने युद्धपातळीवर काम पूर्ण करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

दरम्यान ठेकेदाराकडून गतीने काम होत नसल्यास त्याला काळ्या यादीत टाकून सक्षम ठेकेदाराला काम देण्याच्या सूचनाही अजित पवार यांनी दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा आढावा घेतला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, आमदार दिलीप बनकर, आमदार रईस शेख यांच्यासह मुख्य सचिव नितीन करीर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड, राष्ट्रीय महामार्गाचे क्षेत्रीय अधिकारी ए. श्रीवास्तव उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे, आमदार देवयानी फरांदे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

नाशिक-मुंबई महामार्गाच्या दर्जा उन्नतीचे काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, नाशिक जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना मुंबईला येण्याजाण्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गाच्या सुधारणेचे काम युद्धपातळीवर पूर्ण केले पाहिजे. या मार्गावर गर्दीच्या वेळी १ लाख ७० हजार पॅसेंजर कार युनिट (झ्ळ) एवढी वाहने असतात. त्यामुळे काम करताना अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाशी समन्वय करुन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला रस्ते कामाच्या गतिमान कार्यवाहीत आवश्यक सहकार्य करावे, अशा सूचनाही दिल्या.

सध्याचा कालावधी रस्त्यांची कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी अनुकूल असल्याचे सांगताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, पावसाळ्यामध्ये रस्ते बांधकामात अडथळे येतात. 'एमएसआरडीसी'ने रस्त्यावरील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करावी, हे काम दर्जात्मक होईल याकडे लक्ष द्यावे. काँक्रीटीकरणाच्या कामावेळी वाहतूक व्यवस्था चोख ठेवल्यास अडचण येणार नाही. यादृष्टीने आवश्यक मनुष्यबळ (वॉर्डन), बॅरिकेट्स यांची उपलब्धता करण्यात यावी. जड वाहनांना वेळेची मर्यादा घालण्यात यावी. अरुंद ठिकाणांचे मॅपिंग करावे, अशा सूचनाही बैठकीत दिल्या.

# गंगाखेड विधानसभेचे लोकप्रिय व कार्यसम्राट आ.डॉ.रत्नाकर गुट्टे साहेब यांच्या शुभहस्ते आज गंगाखेड शहरातील पूजा मंगल कार्यालयात ३०२ कामगारांना सुरक्षा कीटचे थेट वाटप करण्यात आले

**दै, जनप्रभात मराठवाडा**
**उपसंपादक ▮ राठोड रामेश पांडित**



गंगाखेडः- गंगाखेड येथे सर्वसामान्य कामगार बंधु आणि भगिनींना दैनंदिन कामात मदत व्हावी, या हेतूने महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने हि कीट कामगारांना मोफत दिली जाते.

अंगमेहनत करणाऱ्या कामगार बांधवांना या सुरक्षा कीटमुळे मोलाची मदत होत आहे. त्यामुळे तब्बल ३०२ लाभार्थ्यांना थेट लाभ देण्यात आला. दररोज लागणाऱ्या आवश्यक वस्तुंची कीट मिळाल्याने कामगार सुध्दा आनंदी होत आहेत. सामान्य घटकांचा विचार करून शासनाने हाती घेतलेली हि योजना निश्चित दुरदृष्टीचे उदाहरण आहे, असे आ.डॉ.रत्नाकर गुट्टे साहेब यांनी म्हटले.

यावेळी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रल्हादराव मुरकुटे, रासपा जिल्हाध्यक्ष अँड. संदीप अळनुरे, तहसिलदार प्रदिप शेलार, गट विकास अधिकारी जयराम मोडके, पालम तालुका प्रभारी माधवराव गायकवाड, गंगाखेड तालुका प्रभारी हनुमंत मुंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संभुदेव मुंडे, माजी नगरसेवक नागनाथ कासले, बालासाहेब ढोले, वैजनाथराव टोले, उध्दव शिंदे, संदीप राठोड, संतोष पेकम, प्रताप मुंडे, संजय पारवे, पत्रकार पिराजी कांबळे, चंद्रकांत गायकवाड यांच्यासह जमलेले सर्व बांधकाम कामगार व माता-माऊली मोठया संख्येने उपस्थित होते.

# लातूरमधील 'रेशन' चा काळाबाजार चालवणारा'फेरोज' आता नांदेड मध्ये दाखल!



**दै, जनप्रभात मराठवाडा**
**उपसंपादक ▮ राठोड रामेश पांडित**

लातूरः- सरकारच्या माध्यमातून कोरोना काळापासून सर्वसामान्य व गरिबांना मोफत अन्नधान्य मिळत आहे. मात्र, हेधान्य नागरिकांच्या उपयोगात येत नसून सर्रासपणे स्थानिक व्यापाऱ्यांना विक्री करीत आहेत.यामध्ये 'फेरोज'नामक व्यक्तिचा हात असल्याचे आता उघड बोलले जावू लागले आहे.विशेष म्हणजे ज्या कंत्राटदाराला हे काम लातूर मध्ये मिळाले होते त्याच कंत्राटदाराला नांदेड़ मध्ये काम मिळाले असून ,त्या कंत्राटदाराचा सुपरवाइजर म्हणुन तो काम पाहत आहे.मागील कित्तेक वर्ष त्याने लातूर मधील गोरगरिबांचा तोंडचा घास हैदराबाद पासून ते गुजरात, मध्यप्रदेश पर्यंत धान्याची काळयाबाजारात विक्री केली आहे.डिसेंबर मध्ये आता लातूरचे कंत्राट संपल्यामुळे आता त्यास नांदेड चे कंत्राट मिळाले आहे.

अधिकारि पासून ते संबंधीत पोलिसांपर्यंत न चुकता हप्ता देत असणारा हा 'फेरोज'नांदेड मध्ये धडकला आहे.तेथील अधिकारी आणि कर्मचार्यांनी आता वेळीच सावध होवून नजर ठेवण्याची आवश्यकता बनली आहे.

शासकीय धान्याचा काळाबाजार मागील अनेक दिवसांपासून त्याने सुरू ठेवला आहे.त्याची काम करण्याची पध्दत आश्चर्यचकीत करणारी आहे.ज्या गाड्यांमधून धान्याची वाहतूक करायची आहे त्या गाड्यांना जीपीएस लावणे बंधनकारक असताना तो लावत नाही.रात्रीच्या वेळेस गोडावून किपर ला हाताशी धरून लाखों टन धान्य काळयाबाजारात विकतो त्याने यासाठी काही लोकांची फौजच तयार केली आहे.यांच्या माध्यमातून तो मध्यप्रदेशातील मोठ्या व्यापाऱ्यांना विकत असल्याची चर्चा आहे.

यासंदर्भात स्थानिक प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणात अद्याप कुठल्याही व्यापाऱ्यांवर व दुकानदारावर कारवाई न झाल्याने मोठ्या प्रमाणात शासकीय धान्याचा काळाबाजार सुरू असल्याचे दिसून येत आहे. यावर लगाम लावण्याची गरज आता निर्माण झाली आहे.

### माय सावित्री

माय सावित्री आम्ही तुला अनेक
पुरस्कारांनी सन्मानित केलं .
कधी चिखल, कधी दगड
कधी शेण, कधी हडळ
कधी धर्मबुडवी ..
पण तू मात्र एखाद्या दगडावरही
बोधी वृक्ष बहरावा....
तशी आपल्या कार्यकर्तृत्वाने
बुद्धाची करुणा होऊन बहरली
तू झाली तमाम सूर्यकळ्यांची व
सूर्यफुलांची सावली ....
आज सगळ्याच सूर्यकळ्या
जणू स्वयंप्रकाशित झाल्या
कधी वटसावित्रीच्या व्रताला
कधी सरस्वतीच्या पूजेला
मनोभावे व्रतस्थ बसल्या...
तुलाही त्यांनी आधुनिक सरस्वती
असं गोंडस नाव दिलं ...
तसं तुझ्या पातळावरचं शेणचिखल
छद्मी पणानं मिस्किल हसलं
आणि मी मात्र ....
म.फुलेंना फोटोतून रडताना पाहिलं.

**हि. रा. गवई (पर्यवेक्षक)**
**श्री शिवाजी विद्यालय मुख्य शाखा अकोला ७३८७६५१५१४**

# हिंगणघाट येथे छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात होणार सुसज्ज योग भवन,तलाव व अंतर्गत परिसर सौंदर्यीकरण, बाल उद्यान विशेष निधी अंतर्गत २.७५ कोटी मंजूर -: आमदार समीर कुणावार यांची माहिती

**हिंगणघाट ▮ अब्दूल कदीर बख्श**



हिंगणघाट येथे छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात होणार सुसज्ज योग भवन,तलाव व अंतर्गत परिसर सौंदर्यीकरण, बाल उद्यान विशेष निधी अंतर्गत २.७५ कोटी मंजूर - अशी माहिती आमदार समीर कुणावार यांनी दिली. महाराष्ट्र शासनाच्या विशेष निधी अंतर्गत हिंगणघाट येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानामध्ये भव्य-दिव्य योग भवन बांधकामाकरीता १ कोटी रुपये मंजूर झाले आहे त्याचबरोबर उद्यान परिसरातील तलाव ,परिसर सौंदर्यीकरण बाल उद्यान व इतर विकास कामांकरिता १ कोटी ७५ लक्ष असे एकुण २ कोटी ७५ लक्षात रुपये मंजूर झाले आहेत.

आज आमदार समीर कुणावार यांनी योग भवन व इतर विकासकांमाचा आढावा आणि जागा पाहणी दौरा मुख्याधिकारी न.प. हिंगणघाट यांच्यासह केला यावेळी आमदार कुणावार यांनी जागेची पाहणी करत मोठ्या बारकाईने कामं समजून घेत योग्य त्या सूचना त्यांनी केल्या यावेळी तातडीने सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून कामं मार्गी लावण्याचे निर्देश त्यांनी दिलेत याप्रसंगी सुनील डोंगरे, राकेश शर्मा, वसंत पाल गुरूजी,नगर अभियंता जगदीश पटेल, अनिल नासरे, अभियंता अली व इतर उपस्थित होते.

# लातूर-बार्शी-टेंभूर्णी महामार्ग चौपदरीकरणाच्या कामाला गती द्या;उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

## केंद्रीय महामार्ग मंत्रालयाकडील डीपीआर मंजुरीसाठी पाठपुरावा करा

**दै, जनप्रभात मराठवाडा**
**उपसंपादक ▮ राठोड रामेश पांडित**



मुंबई:-दि.२ डिसेंबर - नांदेड, लातूर, धाराशिव, बीड या जिल्ह्यांसह तेलंगणा व कर्नाटक राज्यातून मोठ्या प्रमाणावर येणारी वाहने, सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांसाठी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये झालेली वाढ, त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी लातूर-बार्शी-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाच्या कामाला गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात लातूर-बार्शी-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामांचा आढावा घेतला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, क्रीडामंत्री संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण, संजय शिंदे, मुख्य सचिव नितीन करीर, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य अभियंता संतोष शेलार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महामार्ग चौपदरीकरण कामाचा आढावा घेताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यास जोडणाऱ्या लातूर-मुरुड-येडशी-कुसळंब-बार्शी-कुर्डुवाडी-टेंभुर्णी या महामार्गाचा प्रवाशांकडून वापर वाढत आहे. सध्या या रस्त्यावर १५ हजार पॅसेंजर कार युनिट (झ्ळ) इतकी वाहतूक होते. त्या पार्श्वभूमीवर लातूर ते टेंभूर्णी रस्त्याचे चौपदरीकरण तातडीने होणे आवश्यक आहे. या मार्गासाठी २८२ हेक्टर भूसंपादन करावे लागणार आहे, त्यातील १४ हेक्टर जमीन वनविभागाची आहे. भूसंपादनाच्या समावेशासह केंद्रीय महामार्ग मंत्रालयाकडे पाठविण्यात आलेला महामार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करून घेण्यासाठी पाठपुरावा करावा, अशा सूचनाही दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, येणाऱ्या पावसाळ्याअगोदर महामार्गाशी संबंधित सर्व यंत्रणांनी तातडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. त्यासाठीच्या सर्व आवश्यक त्या मान्यता तत्परतेने प्राप्त करुन घ्याव्यात. या रस्त्याची उपयुक्तता, सद्यस्थितीतील वाहतूक, स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी यांचा मेळ घालून काम करावे. या भागातील साखर कारखान्यांमुळे होत असलेल्या ट्रक, ट्रेलर, हार्वेस्टर या जड वाहतूक साधनांचा विचार करुन त्यादृष्टीने पुलांची उंची ठेवण्यात यावी.या प्रकल्पाची एकूण लांबी १६१.६४७ कि.मी. इतकी आहे. त्यात टेंभूर्णी जंक्शन ते कुसळंब (७४.८२० कि.मी.), कुसळंब ते येडशी (१९.१७७ कि.मी.) आणि येडशी ते पीव्हीआर चौक लातूर (६७.६५० कि.मी.) या तीन पॅकेजचा समावेश आहे. सध्या टेंभूर्णी ते येडशी दरम्यान डांबर टाकून रुंदीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच येडशी ते जावळे, बोरगाव काळे ते मुरुड अकोला यादरम्यान दुपदरीकरणासाठी, तर लातूर विमानतळ जंक्शन ते महिला तंत्रनिकेतन दरम्यान चौपदरीकरणास मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी दिली.

# डॉ. गायकवाड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल द्वितीय वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न

**शिरुर (पुणे) ▮ शकील मनियार**



जांबुत येथील डॉ. गायकवाड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल द्वितीय वर्धापन दिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अनेक नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

ग्रामीण भागातील जनतेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाहीत.या हेतूने डॉ. गायकवाड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जांबुत च्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराची वैशिष्ट्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत डायबिटीस तपासणी,मासिक पाळीतील तक्रारी,हार्मोनल असंतुलन,

डायबिटिस - मनके व गुडघ्याचे आजार

आयुर्वेद व पंचकर्म,रक्त, लघवी तपासणी या सर्व तपासण्या मोफत करण्यात आल्या.डॉ. पियुष विश्वनाथ गायकवाड श्ए ैप्दज्ग्मे,डॉ. प्रियांका विश्वनाथ गायकवाड

श्ॅ श्ग्म्हा, यांनी यापूर्वी अनेक आरोग्य शिबिरे ग्रामीण भागात यशस्वीपणे घेऊन गरजूंना त्याचा लाभ मिळवून दिला आहे.दरम्यान, मंगळवारी झालेल्या मोफत आरोग्य शिबिराने अनेकांना दिलासा मिळाला.निरोगी आरोग्य जगण्यासाठी सतत आरोग्य तपासणी, व फॅमिली डॉक्टरशी सल्ला मसलत आवश्यक असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले.अशा प्रकारचे आरोग्य शिबीर सात्यताने आयोजित करण्यात येतील असे आयोजकांमार्फत आश्वासित करण्यात आले.

डॉ. गायकवाड मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जांबुत च्या वतीने अनेक गरजू लोकांना गरम चादरी चे वाटप करण्यात आले. सर्व रुग्णांना मोफत नाष्ट्याचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी विश्वनाथ गायकवाड, डॉ प्रियांका गायकवाड,सरपंच दत्तात्रय जोरी, माजी सरपंच बाळूशेठ फिरोदिया, माजी पंचायत समिती सदस्य वासुदेव जोरी,माजी सरपंच बाबाशेठ फिरोदिया ,चेअरमन बाळासाहेब पठारे,ग्रामपंचायत सदस्य राहुल जगताप ,ग्रामपंचायत सदस्य गोरक्ष गाजरे ,ग्रामपंचायत सदस्य सुभाष जगताप, पोपट फिरोदिया, युवराज पळसकर, चंद्रकांत थोरात,मधुकर बोऱ्हाडे, गणेश गायकवाड,संदिप गायकवाड, दत्ता आतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# हिट अँड रन कायद्या विरोधात पुणे जिल्हा अधिकारी यांना निवेदन

**दै, जनप्रभात पिंपरी चिंचवड**
**शहर प्रतिनिधी ▮ गोरक्ष मदने**



पिंपरी चिंचवडः-केंद्र सरकारने लागू केलेल्या हिट अँड रन कायदा विरोधात पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात वाहन चालकांनी भक्ति शक्ती चौक निगडी ते पुणे असा मोर्चा काढून पुणे जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देण्यात धीले,

ड्रायव्हर सुरक्षा कायद्याची प्रथमता अंमलबजावणी करा व नंतर हिट अँड रन या नवीन कायद्यामध्ये करावासाचा कालावधी व आर्थिक दंड यामध्ये कमी करून त्यानंतरच कायदा लागू करावा,

अशा मागण्या घेऊन जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्था तसेच महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना तसेच सर्व वाहन चालक मालक यांच्या संयुक्त विद्यमाने मोर्चा काढण्यात आला,

मोर्चाचे संपूर्ण नेतृत्व संघर्ष ग्रुप प्रदेशाध्यक्ष (अवजड विभाग )श्री गोरक्ष मदने व महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेना पुणे जिल्हा संघटक श्री नितीन सूर्यवंशी यांनी केले,

दोनशे ते तीनशे वाहन चालकांनी या मोर्चा त आपला सहभाग नोंदवला,

'जोपर्यंत हा जुलमी कायदा रद्द होत नाही तोपर्यंत आम्ही गाडी चालवणार नाही' असा पवित्रा वाहन चालकांनी घेतला आहे,गेली चार वर्षे आम्ही सरकार कडे वाहन चालक सुरक्षा कायदा करण्याची मागणी जय संघर्ष वाहन चालक सामाजिक संस्थे कडून सतत करत आहोत,परंतु त्या व इतर मागण्या मान्य न करता नवीनच हिट अँड रन हा कायदा केंद्र सरकार आमच्यावर लाधत आहे , असे जय संघर्ष संस्थेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री गोरक्ष मदने यांनी सांगितले,

भारत देशामध्ये दलित आणि आदिवासी यांच्यासाठी जशी कठोर कायद्याची तरतूद आहे तशा एखाद्या कठोर कायद्याची अंमलबजावणी करणे आणि त्या नंतर हिट अँड रन या नवीन कायद्यामध्ये कारावासाचा कालावधी व आर्थिक दंड या मध्ये कमी करून नंतरच हा कायदा लागू करावा असे आंदोलनं कर्त्यांनी सांगितले,

मोर्चा मध्ये मयूर फिरके, चेतन इंगळे, आप्पासाहेब तोडकर संतोष जाधव दिवाकर आल्हाट युवराज जाधव मुकेश वाल्हे, संदीप खारकर,राजू उबाळे, दीपक पोद्दार, मनोज गायकवाड, भारत महानवर, अमोल बोरे, सतीश काळे आणि पुणे मुंबई चालणाऱ्या सर्व माल वाहतूक चालकांनी या मोर्चात सहभाग नोंदवला होता,

# सकाळपासूनच पेट्रोलसाठी नागरिकांची तारांबळ! नो स्टॉक्सचे लागले बोर्ड

**दै, जनप्रभातचे छ.संभाजीनगर**
**जिल्ह प्रतिनिधी ▮ मोहन आखाडे**



छ.संभाजीनगरः केंद्र सरकारने हिट अँड रन कायद्यात बदल केल्यानंतर देशभरातील ट्रकचालक आक्रमक झाले आहेत. नव्या वाहन कायद्याला विरोध म्हणून देशभरातील वाहनचालकांनी तीन दिवसांसाठी संप पुकारला असल्यामुळे अनेक ठिकाणी अवजड वाहने रस्त्यावरच उभी असून पेट्रोल-डिझेल-गॅस या इंधनासह जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा ठप्प झाला. फळे, भाजीपाला, दूध, शेतीमाल यासारख्या वस्तूंच्या वाहतुकीवर परिणाम होत आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरातील पेट्रोल पंपापर सकाळपासून ्द एूदम्व्ये बोर्ड लागले आहेत. सिडको भागातल्या सगळ्या पेट्रोल पंपावर आज सकाळपासूनच नो स्टॉकचे बोर्ड लागल्यामुळे ज्यांच्याकडे पेट्रोल-डिझेल नाही त्यांची आज अडचण होईल असं दिसतंय.

दुसरीकडे आज सकाळपासून अनेक वाहनधारक पेट्रोल घेण्यासाठी पेट्रोल पंपावर थांबून आहेत. एपीआय कॉर्नर इथल्या एका पेट्रोल पंपावर पेट्रोल मिळत असल्यामुळे वाहनधारकांनी तिकडे गर्दी केली होती. सकाळी सकाळी या पेट्रोल पंपावर पेट्रोल डिझेल मिळवण्यासाठी अक्षरशः झुंबड उडाली आहे.

दरम्यान, इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरचालकांनी संप पुकारल्यामुळे नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड, अकोला, धाराशिव, बीड, लातूर, हिंगोली या जिल्ह्यांना पानेवाडीतून इंधन पुरवठा होऊ शकला नाही. त्यामुळे इंधनटंचाईचं संकट निर्माण झालं आहे.

# कोरेगाव भीमामध्ये २०६ वा शौर्य दिन उत्साहात साजरा;अभिवादनासाठी भीम अनुयायांची लाखोंची तुफान गर्दी;विजयस्तंभ परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्ठी





**भि.कोरेगाव (पुणे)** ■ रिजवान बागवान

१ जानेवारी २०२४ रोजी पुणे जिल्ह्यातील ऐतिहासिक कोरेगाव भीमा याठिकाणी २०६ वा शौर्यदिन मोठ्या उत्साहाने शांततेत साजरा करण्यात आला.यावेळी विजयस्तंभाला सलामी,मानवंदना देण्यासाठी व अभिवादन करण्यासाठी लाखो आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येंने गर्दी केली होती.याप्रसंगी विजयस्तंभ परिसरात हेलिकॉप्टरने पुष्पवृष्ठी करण्यात आली.

२०६ वा शौर्यदिनानिमित्त कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभाला लाखो आंबेडकरी अनुयायांनी अभिवादन केले.विजयस्तंभाला फुलांची सजावट करण्यात आली होती.प्रशासनाने शौर्यदिनाची जय्यत तयारी केली होती तसेच पंचक्रोशीत व परिसरात मोठ्या संख्येंने कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

२०६ वा शौर्यदिनानिमित्त कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्यासह विविध राज्यभरातुन अनुयायी आले होते.

विजयस्तंभ परिसरात रविवारी मध्यरात्रीपासून फटाक्यांची आतषबाजी तसेच सामुदायिक बुद्ध वंदनेने कार्यक्रमास सुरुवात झाली.समता सैनिक दल,महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

अभिवादन करण्यासाठी कोरेगाव भीमा आणि पेरणे परिसरात येणाऱ्या लाखो अनुयायांना कोणत्याही सुविधा कमी पडणार नाहीत,याबाबतची खबरदारी जिल्हा प्रशासनाने घेतली होती.यावर्षी मोठ्या संख्येने येणाऱ्या अनुयायांबरोबरच बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुविधेसाठी जिल्हा प्रशासनाने वाढीव संख्येने जय्यत तयारी केली होती.

# अपंग शेतकऱ्याची पीएम किसान सन्मान निधीसाठी फरफट

**लहान आर्वी** ■ सुनिल साबळे



लहान आर्वी स्थानिक मौजा लहान आर्वी येथील अपंग शेतकरी गणपत महादेव गायकी यांच्या कडे शेत सर्वे नंबर १७४ प्रमाणे शेती आहे. सदर शेतीच्या माध्यमातुन अपंग शेतकर्याला पी. एम. कीसानचे ५ हप्ते मिळाले. परंतु ६ व्या हप्त्या पासुन अपंग शेतकरी गणपती महादेव गायकी प्रशासनाकडे जाऊ जाऊ कंटाळल्याने फरफट झाली आहे. अपंग शेतकरी गणपत महादेव गायकी हे तहसील कार्यालयात गेले असता त्यांना क्रुषी विभागात जाऊन पी.एम.कीसान टेबलवर चौकशी करण्याचे सांगितले. अपंग शेतकरी क्रुषी विभागात गेल्यावर तेथील रुपाली नामक कंत्राटी कर्मचारी महिलेने त्यांना बॅकेत जाऊन आधार लिंक करण्याचे सांगितले.त्या महिलेच्या सांगितले प्रमाणे अपंग शेतकरी अंतोरा येथील बॅक ऑफ इंडीया मध्ये गेले तर त्यांचे आधार बॅक खात्याला लिंक असल्याचे सांगितले. परत अपंग शेतकरी क्रुषी विभागात गेले आणि आधार बॅक लिंक असल्याचा पुरावा दाखवला तर त्या शेतकर्याला पैसे का बरं येत नाही हेच आम्हाला कळत नाही.अशा पध्दतीने क्रुषी विभागाने लहान आर्वी येथील अपंग शेतकर्याची फरफट केली आहे. या सर्व गोष्टींवरून शेतकर्यांच्या पी. एम. कीसान योजनेकडे क्रुषी विभागाचा आणि महसुल विभागाचा समन्वय नसल्याचे दिसून येतो.प्रशासनाच्या दप्तर दिरंगाई मुळे शेतकर्यांवर अशा पध्दतीची पाळी आल्याने पी. एम. कीसान योजनेचे आष्टी तालुक्यात तीन तेरा वाजले असे म्हणायला हरकत नाही.

# आष्टीत मावळत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे जल्लोषात स्वागत



**लहान आर्वी** ■ सुनिल साबळे

आष्टी (शहीद) : स्थानिक आष्टी येथील विठ्ठल मंदीर रोडवरील ,वानीपुरा येथील स्व. भैय्याजी अनासाने चौकातील 'कोल्हे वाड्यात' महीलांनी एकत्र येऊन मावळत्या २०२३ या वर्षाला देत रात्री १२ वाजता २०२४ या नववर्षाचे फटाक्यांच्या आतीषबाजीत जल्लोषात स्वागत केले. यावेळी महीलांनी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भजने, भक्तीगीत, भावगीत गायली, तसेच मुलींनी संगीत खुर्चीचे आयोजन केले होते. यावेळी प्रत्येक घरातील पुरुषांनी महीलांना सहकार्य केले. रात्री १२ पर्यंत विविध प्रकारचे कार्यक्रम करून नववर्ष २०२४ या वर्षाचे फटाक्यांच्या आतीषबाजीत जल्लोषात स्वागत केले. हा कार्यक्रम वानीपुरा मोहल्यातील महीलांनी एकत्र येऊन गेट टु गेदरच्या धर्तीवर आयोजित केला होता. त्यामुळे या कार्यक्रमात भोजनाचे सुध्दा आयोजन केले होते. बाजार ओळीतील भेल भंडारचे मालक अशोक कोल्हे आणि शोभा कोल्हे या दाम्पत्यांनी या कार्यक्रमाची धुरा उचलली होती. मोहल्यातील इतर सर्व महीलांनी त्यांना सहकार्य करून अत्यंत मेहनतीने नववर्षाच्या स्वागताची तयारी केली. यावेळी महीलांनी तसेच पुरूषांनी मोठ्या प्रमाणात डान्स करून नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले.

यावेळी शोभा कोल्हे, भावना बाजारे,माधुरी गावंडे,गिता गुरूव,सिमा कलंत्री,उन्नती भोंबे,दर्शना गावंडे,प्रिती सुतोने,विनया साबळे,सोनाली सवाई,प्रज्ञा इंगळे,छाया अनासाने,निशा काळे, पायल साबळे, श्वेता चौधरी,राजश्री मानकर, माला धस्कट,शोभा मांडवे,मंगला काकपुरे,कमला इंगळकर,प्रज्ञा इंगळे,अनीता जोध,श्वेता टेंभरे,देव्यानी गुंबळे,माही गावंडे, अन्वी भोंबे, डॉली सुतोने, गौरी सुतोने, भावेश गावंडे, गुनगुन सवाई, प्रिंन्स इंगळे, धारा इंगळे,आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वश्री अशोक कोल्हे ,प्रितेश कोल्हे, डॉ. सचिन सरोदे, नरेंद्र गावंडे, अनिल गुरूव,सुनिल बाजारे, गणेश सुतोने, संजय वानखडे,ललीत भोंबे, सुनिल साबळे,रोशन काकपुरे,चिन्मय गावंडे,रोहित साबळे यांनी अथक परीश्रम घेतले.

**भजन भक्तीगीत आणि संगीत खुर्चीचे आयोजन**
**कोल्हे दाम्पत्यांनी सांभाळली कार्यक्रमाची धुरा**

# वडवणी मध्ये सावित्री मातेची अभिवादन रॅली संपन्न

**बीड** ■ गितांजली लव्हाळे



वडवणी शहरांमध्ये सावित्री मातेची १९३ व्या जयंतीनिमित्त २ जानेवारी सायंकाळी ७-०० वाजता मशाल पेटऊन र?ली काढण्यात आली. यावेळी लोकमान्य टिळकचे माजी प्राचार्य डॉक्टर अशोक खेत्री ,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राऊत डी डी ,समता परिषदेचे प्रा. वैजनाथ शिंदे सर,या रॅलीचे मुख्य प्रायोजक प्रा तेजस शिंदे सर ,या रॅलीसाठी गुरुकुल वसतिगृहाचे संचालक प्रा. विष्णू डोईफोडे ,प्रा. गोरख दराडे , श्री अनुरथभैया मस्के ,प्रा वैजीनाथ शिंदे सर,अ ?ड लहु खारगे सर श्री सुशेन मुंडे, श्री कागणे सर,बडे सर,मुंडे सर, प्रा.वडमारे सर ,प्रा. पंकज कळसकर , प्रा इथापुरे सर ,अर्जुन मुंडे सर,श्री माऊली कटारे सर, रामेश्वर यादव ,कल्याण शिंदे ,राजाभाऊ अवचार ,रुक्मिणी शिंदे ,अर्चना यादव या सर्वांनी या रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला .यावेळी या वस्तीग्रहातील विद्यार्थी प्रचंड प्रमाणात उपस्थित होते. या वस्तीग्रहातील विद्यार्थिनींनी सावित्रीमाईंच्या वेषभूशेत मशाल हाती घेऊन शहराच्या मुख्य रस्त्यावरून रॅली काढली व घोषणा देत देत मुख्य रोडवरुन संपन्न झाली. या रॅलीचे विसर्जन प्रा.तेजस शिंदे सर यांनी सावित्रीबाई फुलेंचा पूर्णाकृती पुतळा बसविलेला आहे त्या महात्मा फुले चौकात विसर्जन करण्यात आले .यावेळी दराडे सर, डोईफोडे सर ,राऊत सर,खेत्री सर ,वैजीनाथ शिंदे सर ,यांनी विचार व्यक्त केले व आभार ईथापुरे सर यांनी व्यक्त केले. तर या कार्यक्रमाचे प्रस्तावित प्रा.तेजस खंडूजी शिंदे यांनी केले.ली कटारे सर,यांनी व्यक्त केले. तर या कार्यक्रमाचे प्रस्तावित प्रा.तेजस खंडूजी शिंदे यांनी केले.

# वाबळेवाडी शाळेचे क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश

**सिद्धी माळी, पौर्णिमा मासळकर आणि आर्यन कामठे तालुक्यात प्रथम**

**दै, जनप्रभात उपसंपादक लातूर जिल्हा ■ विष्णू मोहन पोले**



यशवंतराव चव्हाण तालुकास्तरीय कला क्रीडा स्पर्धेत वाबळेवाडी शाळेच्या सिद्धी माळी, पौर्णिमा मासळकर आणि आर्यन कामठे या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत तालुक्यात बाजी मारली. त्यांनी मिळवलेल्या उत्तुंग यशाबद्दल शाळेकडून या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका शरिफा तांबोळी यांच्या हस्ते या सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण तालुकास्तरीय कला क्रीडा स्पर्धा नुकत्याच शिरूर येथे सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूल या ठिकाणी पार पडल्या. या स्पर्धेत मोठ्या गटातील लांब उडी स्पर्धेत आर्यन कामठे, मुलींच्या उंच उडी स्पर्धेत पोर्णिमा मासळकर तर वक्तृत्व स्पर्धेत सिद्धी माळी या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका शरिफा तांबोळी, शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन व शिष्यवृत्ती तज्ञ विजय गोडसे, सुनिल पलांडे, जयश्री पलांडे, किरण अरगडे, गोरक काळे, प्रतिभा पुंडे, दीपक खैरे, तुषार सिनलकर, पोपट दरंदले, विद्या सपकाळ, वैशाली जगताप, गितांजली वाघोले आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते.

तर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप वाबळे, उपाध्यक्ष मल्हारी वाबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाशकाका वाबळे, माजी सरपंच केशव वाबळे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष अंकुश वाबळे, सतिश वाबळे, सुरेखा वाबळे, सतिश कोठावळे, प्रकाश विठ्ठल वाबळे, भगवान वाबळे, खंडू वाबळे, काळूराम वाबळे आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन बेंडभर यांनी केले. स्वागत विजय गोडसे तर आभार किरण अरगडे यांनी मानले.

# कोरेगाव भीमा;संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने १ हजार अनुयायींना अन्नदानाचे वाटप



**भि.कोरेगाव (पुणे)** ■ रिजवान बागवान

१ जानेवारी २०२४ रोजी कोरेगाव भीमा येथे २०६ व्या शौर्य दिनानिमित्त विजस्तंभास मानवंदना व अभिनादन करण्यासाठी आलेल्या हजारो अनुयायींना संकल्प बहुउद्देशीय संस्था (चारमोळी) यांच्या वतीने अन्नदानाचे वाटप करण्यात आले.

संकल्प बहुउद्देशीय संस्था हि नेहमी विविध कार्यक्रमाच्या माध्यामातुन समाज बांधवांची मदत करत असते;यावर्षी संस्थेच्या वतीने व लोकसहभागाच्या माध्यमातुन कोरेगाव भीमा येथे अन्नदान वाटप कार्यक्रम घेण्यात आला.याप्रसंगी हजारो अनुयायींनी अन्नदानाचा लाभ घेतला आहे.या अन्नदान वाटप कार्यक्रमाप्रसंगी संकल्प बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मुकेश कवडे,संस्थेचे सतिष कवडे,तुकाराम मोरे,दादासाहेब सोनवणे,तात्याराम मोरे,मुकेश गायकवाड सर आदि उपस्थित होते.

# महाराष्ट्र पोलिस वर्धापन दिनी शिक्रापुर पोलिसांचा सन्मान

**शिक्रापूर (पुणे)** ■ रिजवान बागवान



दि २ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र पोलिस वर्धापन दिनानिमित्त सणसवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर चव्हाण मित्र परिवाराच्या वतीने शिक्रापुर पोलिस स्टेशन या ठिकाणी पोलीसांना गुलाबपुष्प देऊन व पेढे भरून शुभेच्छा देऊन सन्मान करण्यात आला.

भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता;त्यामुळे २ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र पोलीस दिन म्हणुन साजरा केला जातो.त्या अनुषंगाने शिक्रापुर पोलिस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस दिनाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

यावेळी शिक्रापुर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक वैभव पवार साहेब,महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते किशोर चव्हाण,पत्रकार शेरखान शेख,पत्रकार रिजवान बागवान,पोलीस हवालदार राजेश माने,पोलीस हवालदार संदिप कारंडे,पोलीस हवालदार सहदेव ठुबे,महिला पोलीस नाईक चव्हाण मॅडम,ट्राफिक पोलिस नाईक मिलिंद देवरे,पोलीस नाईक निरज पिसाळ,युवा कार्यकर्ते सिध्दाराम हिरेमठ,राकेश मोरे,सुरज चव्हाण आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपा महिला मोर्चा उदगीर तालुका आणि शहर आढावा बैठक संपन्न

**दै, जनप्रभात उपसंपादक लातूर जिल्हा ■ विष्णू मोहन पोले**



उदगीर येथे जिल्हा विधानसभा मतदारसंघ ता उदगीर आणि उदगीर शहर आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीला उपस्थित मान्यवर जिल्हा आध्यक्ष उत्तराताई कलबुर्गे आणि महिला मोर्चाच्या लातूर लोकसभेच्या संयोजिका भाग्यश्री ताई श्रीसागर शहराध्यक्ष मनोजदादा पुदाले शहर सरचिटणीस आनंदभाऊ बुंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीत उदगीर तालुका आणि शहर यातील विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली आणि मान्यवरांनी पदाधिकाऱ्यांना पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले तसेच महिला पदाधिकारी रेणुका दुबुकवाड आणि सुलोचना जाधव यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी प्रमुख उपस्थितीत महिला मोर्चाच्या जिल्हा मंदाकीनी जिवनेताई जि,उ,आणिताताई बिरादार, जि,उ, मधुमती कनशेट्टे, जि,उ, सावित्रा पवार. जि.सरचिटणीस जया काबरा. जि.उ.रेणुका डुबुकवाड जेष्ट नेत्या रमाबाई वाघमारे. ता. आध्यक्ष उषा माने उपाध्यक्ष. दिपा कोंगे. ता.उ.शशीकला पाटील. ता.उ.मेघा गुंडरे. ता.उ.सुलोचना जाधव. ता.सरचिटणीस कांताताई सुर्यवंशी. ता.सरचिटणीस रंजना चिघळे. ता.सरचिटणीस. संगीता पाटील. उदगीर विधानसभा प्रमुख वर्षाराणी धावारे. आरती सुर्यवंशी. शहराध्यक्ष शिल्पा ईगंळे. शहर सरचिटणीस शिवगंगा बिरादार.महेश धवरे भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या सर्व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

# शौर्य दिनानिमित्त अहमदपूरात स्मृतीस्तंभास मानवंदना

**दै, जनप्रभात उपसंपादक लातूर जिल्हा ■ विष्णू मोहन पोले**



अहमदपूर दि. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त स्मृतीस्तंभास मानवंदना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सकाळी भारतीय बौध्द महासभेच्या वतीने सामूहिक मानवंदना कार्यक्रम आयोजित केला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास आणी विजयस्तंभ प्रतिकृतीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी अहमदपूर तालुक्यातील अनेक राजकीय, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या नेते, कार्यकर्ते मंडळींनी पुतळ्यासमोर उभारलेल्या विजय स्तंभाच्या प्रतिकृतीस मानवंदना दिली.

या मानवंदनेस आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे, नगरसेवक युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, महेंद्र ससाणे, रिपाईचे नेते अरूणभाऊ वाघंबर, माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,पत्रकार शिवाजीराव गायकवाड, मेघराज गायकवाड, भीमराव कांबळे, अनू.जाती मोर्चाचे सचिव जीवन गायकवाड, भारतीय बौध्द महासभेचे तालूकाध्यक्ष प्रसाद गायकवाड,वाय.डी. वाघमारे,ग्रामविकास अधिकारी राजाराम पाटील,बौध्दाचार्य शिवाजी दूगाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बाबासाहेब वाघमारे यांनी केले.तर आभार सचिन बानाटे यांनी मानले.

तसेच येथील बौध्द नगर येथे शौर्य दिनाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात सहभागी होवून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या प्रसंगी अँड.सूभाषराव सोनकांबळे,राजवीर मतकर, सुमित बनसोडे, अभय गायकवाड, दिनेश तिगोटे,वैभव सोनकांबळे,अभय गुळवे, शुभम नावंदे, सुजल सोनकांबळे,सूरज रायभोले ,अजय आचार्य सह युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242